POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२३७ ● मुंबई, मंगळवार, ३१ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## गॅस सेवांच्या नावाखाली सायबर फसवणूक

### एपीके फाइलने काही मिनिटांत बँक खाती रिकामी, काय काळजी घ्यावी?




**काय काळजी घ्यावी?**

- अनोळखी लिंक किंवा फाइल डाउनलोड करू नका
- फक्त अधिकृत वेबसाइट किंवा ॲप वापरा
- संशयास्पद कॉल किंवा संदेशांवर विश्वास ठेवू नका
- फसवणूक झाल्यास त्वरित १९३० या सायबर हेल्पलाइनवर संपर्क साधा

या प्रकारांमुळे नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

अमेरिका–इराण तणावाच्या पार्श्वभूमीवर देशात गॅस तुटवड्याची भीती निर्माण झाली असताना मुंबईत सायबर गुन्हेगारांनी याच भीतीचा गैरफायदा घेत नागरिकांना लक्ष्य केले आहे. महानगर गॅस लिमिटेडचे अधिकारी असल्याचे भासवून नागरिकांना धमकावले जात असून, त्यांच्या मोबाईल आणि बँक खात्यांवर डल्ला मारला जात आहे.

**गॅस तुटवड्याच्या भीतीचा गैरफायदा**

मुंबईत गेल्या महिनाभरात अशा फसवणुकीची अनेक प्रकरणे समोर आली असून जवळपास १ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा अंदाज आहे. फसवणूक करणारे प्रथम नागरिकांना थकबाकी बिल आणि गॅस बंद होण्याचा इशारा देणारे संदेश पाठवतात. त्यानंतर ते छोट्या रकमेचे पेमेंट करून विश्वास संपादन करतात आणि पुढे एपीके फाइल डाउनलोड करण्यास भाग पाडतात.

**एपीके फाइलमधून खात्यावर डल्ला**

ही एपीके फाइल प्रत्यक्षात मालवेअर असते. ती डाउनलोड केल्यानंतर फसवणूक करणाऱ्यांना मोबाईलमधील ओटीपी, बँकिंग माहिती आणि इतर संवेदनशील डेटा मिळतो. त्यामुळे काही मिनिटांतच बँक खात्यातील मोठी रक्कम काढली जाते.

**धक्कादायक घटना**

मुलुंड पश्चिम येथील २० वर्षीय व्यापाऱ्याने १,१५० रुपये भरल्यानंतर 'Mahnagar gas bill update.apk' नावाची फाइल डाउनलोड केली. त्यानंतर काही मिनिटांतच त्याच्या खात्यातून तब्बल ११.८२ लाख रुपये काढण्यात आले. तर मालाड पूर्व येथील ७५ वर्षीय निवृत्त व्यक्तीलाही अशाच प्रकारे ८.५९ लाख रुपयांचा फटका बसला.

**पोलिसांचा इशारा**


मुंबई पोलिसांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. कोणतीही गॅस कंपनी एपीके फाइल पाठवत नाही किंवा फोनवरून ओटीपी, पासवर्ड किंवा बँक तपशील मागत नाहीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## पुढील 5 दिवस वादळी पावसाचा इशारा

### मुंबईसह कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात गारपिटीची शक्यता

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्रात उष्णतेच्या लाटेनंतर आता पुढील पाच दिवस मुंबई आणि महानगर प्रदेशासह संपूर्ण राज्यात मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस होईल, असा इशारा भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) दिला आहे. पुणे, नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, सोलापूर आणि मराठवाडा यांसारख्या अनेक जिल्ह्यांमध्ये ताशी ५० ते ६० किमी वेगाने वाहणारे वारे आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याने 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. दरम्यान, हवामानातील हा बदल लक्षात घेऊन राज्य सरकारने शेतकऱ्यांना ३० मार्च ते ४ एप्रिल या काळात काढणीला आलेली पिके वादळ, गारपीट




आणि वाऱ्यापासून वाचवण्यासाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. कृषी विभागाने रविवारी प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, ३० मार्चला प्रामुख्याने खान्देश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रातील घाट क्षेत्रांत काही ठिकाणी मेघगर्जना, सोसाट्याचा वारा आणि गारपिटीची शक्यता आहे. उर्वरित विदर्भातही हवामानात बदल जाणवेल. ३१ मार्चला पावसाचा जोर काहीसा कमी होईल; मात्र, हवामान अस्थिर राहील. त्यानंतर १ ते ४ एप्रिल दरम्यान पावसाची तीव्रता पुन्हा वाढण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## 1 एप्रिलपासून गॅस सिलेंडर महाग?

### इराण-इस्त्रायल-अमेरिका युद्धाने वाढवले टेन्शन

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

इराण–इस्त्रायल आणि अमेरिका युद्ध अजून काही महिने लांबण्याची शक्यता आहे. अमेरिकेन सैनिक आखातात उतरले आहेत. तर देशात पुढील दोन महिने पुरेल इतका इंधन आणि गॅस साठा असल्याचा दावा केंद्र सरकारने केला आहे. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी देशात लॉकडाऊन लागण्याच्या चर्चा फेटाळल्या आहेत. सरकारपुढे असा कोणताही प्रस्ताव नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पण युद्ध लांबल्यास 1 एप्रिलापासून खरंच गॅस सिलेंडरच्या किंमती वाढणार का? याची काळजी नागरिकांना लागली आहे. केंद्र



सरकारने स्पष्ट केले आहे की, सध्याची जागतिक स्थिती पाहता देशात इंधन अथवा इतर अत्यावश्यक वस्तूंची कोणतीही कमी नाही. मंत्रालयानुसार, भारताकडे तेल आणि गॅसचा मुबलक साठा आहे. पुढील 60 दिवसांची तयारी अगोदरच पूर्ण करण्यात आली आहे. याशिवाय भारत आता 41 हून अधिक देशांकडून कच्चे तेलाची आयात करत आहे. त्यात होमूर्ज स्ट्रेटचा कोणताही अडथळा नाही. पण तरीही गॅस एजन्सीसमोरील रांगा कमी झालेल्या नाहीत. तर अनेक पेट्रोल पंप बंद पडले आहेत. जिथे पेट्रोल–डिझेल उपलब्ध आहेत, त्या पेट्रोल पंपावर गर्दी झाली आहे.

**एलपीजी सिलेंडर महाग होणार?**

सध्या इराण-इस्त्रायल आणि अमेरिकेतील तणाव निवळण्याची चिन्हं कमी आहेत. आखातातील तणावाचा परिणाम पेट्रोल-डिझेलसह नैसर्गिक गॅसवर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे 1 एप्रिल, 2026 रोजी एलपीजी गॅस ग्राहकांना झटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अर्थात केंद्र सरकारकडून याविषयीचे कोणतेही अधिकृत वृत्त, वक्तव्य आलेले नाही. तेल वितरण कंपन्या प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला गॅसच्या किंमतींची समीक्षा करते. मध्यपूर्वेतील तणाव आणि तेल संकटादरम्यान कच्चे तेल आणि गॅस किंमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या एक तारखेला ग्राहक खरंच एप्रिल फुल होतात की खिशाला झळ बसते हे समोर येईल. मार्च 2026 रोजी घरगुती गॅस सिलेंडरच्या किंमतीत 60 रुपयांची वाढ झाली. आता गॅस सिलेंडरच्या किंमती 853 च्या जवळपास आहे. प्रत्येक शहरानुसार या किंमतीत आणि कर्मचारी वाहतूक खर्च जोडत असल्याने फरक जाणवतो. व्यावसायिक गॅसच्या किंमतीही वधारल्या आहेत. तर त्यांचा मोठा तुटवडाही समोर आला आहे. इराण युद्धामुळे एलपीजी सोबतच सीएनजी आणि पीएनजी च्या किंमतीत 1 एप्रिलपासून मोठ्या बदलाची शक्यता आहे.

## गॅसचं बिल ११०० रुपये, पण मुंबईतील व्यावसायिकाने गमावले १२ लाख... युद्धाच्या परिस्थितीचा चोराकडून फायदा

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

आखाती देशातील युद्धामुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाईचा फायदा सायबर चोरांकडून पुरेपूर घेतला जात आहे. गॅस बिल भरले नाही, अपडेट झाले नाही, असे संदेश पाठवून ग्राहकांच्या फसवणुकीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अशातच मुलुंडच्या व्यावसायिकाकडून १,१०० रुपयांच्या बिलासाठी १२ लाख रुपये उकळण्यात आले. याप्रकरणी व्यावसायिकाच्या तक्रारीवरून सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईतील ट्रान्सपोर्ट व्यावसायिकाच्या मोबाइलवर गुरुवारी एक संदेश आला. तत्काळ गॅस बिल भरा, अन्यथा गॅस कनेक्शन तोडण्यात येईल, असे या संदेशात नमूद करण्यात आले होते. आधीच गॅस टंचाई त्यात गॅस कनेक्शन




बंद करण्यात आले तर पंचाईत होईल, असा विचार करून व्यावसायिकाने १,१५० रुपये बिल भरले. काही वेळाने त्यांना एका व्यक्तीचा फोन आला. त्याने महानगर गॅस कंपनीतून बोलत असल्याचे सांगत बिलाबाबत विचारणा केली. यावर व्यावसायिकाने काही वेळापूर्वी बिल भरल्याचे सांगितले. समोरील अधिकाऱ्याने बिल अपडेट झाले नसल्याचे सांगितले. बिल अपडेट करण्यासाठी एक एपीके फाइल पाठवली.

व्यावसायिकाने एपीके फाइलवर क्लिक करून ज्या बँक खात्यामधून बिल भरले त्याचा तपशील टाकला. सबमिट करण्यासाठी त्यांना एक ओटीपी आला. त्यांनी हा ओटीपी टाकताच त्यांच्या बँक खात्यामधून सुमारे १२ लाख रुपये परस्पर वळविण्यात आले. पैसे जात असल्याचे संदेश येताच व्यावसायिकाने बँकेत संपर्क साधला आणि पुढील व्यवहार बंद केले. ही सायबर फसवणूक असल्याचे कळताच त्यांनी याबाबत पूर्व विभाग सायबर पोलिस ठाण्यात तक्रार केली.

## आत्महत्येला प्रवृत्त केल्याप्रकरणी

### एनसीबीच्या मुंबई विभागीय संचालकासह तिघांवर गुन्हा

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

नवी मुंबईतील बांधकाम व्यावसायिक (बिल्डर) गुरुनाथ चिंचकर यांच्या आत्महत्येप्रकरणी नवी मुंबई पोलिसांनी अमली पदार्थ नियंत्रण ब्युरोचे मुंबई विभागीय संचालक अमित घावटे, एनसीबीचे आणखी एक अधिकारी आणि नवी मुंबई पोलिसांचे एक वरिष्ठ निरीक्षक यांच्याविरुद्ध आत्महत्येला प्रवृत्त करणे आणि खंडणी मागणे या आरोपांखाली एफआयआर दाखल केला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार हा एफआयआर नोंदवण्यात आला आहे. चिंचकर यांची पत्नी किरण यांनी दाखल केलेल्या एका रिट याचिकेवर सध्या उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे.

गेल्या वर्षी गुरुनाथ चिंचकर यांनी बेलापूर येथील आपल्या राहत्या घरी पिस्तुलाने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली होती. ते अमली पदार्थांच्या एका टोळीचे (सिंडिकेटचे) कथित सूत्रधार असलेल्या नवीन चिंचकर याचे वडील होते. नवीन याला गेल्या वर्षी मे महिन्यात मलेशियाहून भारतात आणण्यात आले होते आणि सध्या तो आपल्या धाकट्या भावासह तळोजा कारागृहात शिक्षा भोगत आहे. त्याचा धाकटा भाऊ धीरज यालाही अमली पदार्थांशी संबंधित एका गुन्ह्याच्या संदर्भात गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये मलेशियाहून भारतात आणण्यात आले होते.

एप्रिल 2022 मध्ये, आयआरएस अधिकारी समीर वानखेडे यांच्या जागी अमित घावटे यांनी एनसीबीच्या मुंबई विभागीय संचालकपदाचा कार्यभार स्वीकारला होता. तसेच चिंचकर बंधूंशी संबंधित प्रकरणाच्या तपासावर त्यांनीच देखरेख केली होती.



घावटे यांच्याव्यतिरिक्त या एफआयआरमध्ये एनसीबीचे अधिकारी आकाश मलिक आणि नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ निरीक्षक संदीप निगाडे यांची नावांचा समावेश आहे. तपासाच्या संदर्भात आकाश मलिक यांनी चिंचकर यांच्या घरी भेट दिली होती, तर संदीप निगाडे हे देखील या प्रकरणाची चौकशी करत होते, असा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, रिट याचिकेवर झालेल्या सुनावणीदरम्यान मुंबई उच्च न्यायालयाने नवी मुंबई पोलिसांना या प्रकरणात एफआयआर दाखल करण्याचे तोंडी निर्देश दिले. त्यानंतर, पोलिसांनी किरण चिंचकर यांना बोलावून घेतले आणि त्यांच्या जबाबाच्या आधारे, या तिन्ही अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

किरण चिंचकर यांनी आपल्या जबाबात असा आरोप केला आहे की, आपल्या मुलांची नावे एफआयआरमधून वगळण्यासाठी अमित घावटे यांनी 10 ते 15 कोटी रुपयांची मागणी केली होती. तसेच ही रक्कम न दिल्यास आपल्या मुलांना खोट्या गुन्ह्यांमध्ये गोवण्याची धमकीही दिली होती. यासंदर्भात अनेकदा एनसीबी कार्यालयात बोलावण्यात आले आणि तिथे त्यांना दिवसभर बसवून ठेवण्यात आले. तसेच संदीप निगडे याने त्यांच्या पतीच्या कार्यालयाला भेट दिली आणि त्यांच्या मुलांना पोलिसांसमोर हजर करण्याची किंवा पैशांची मागणी करण्याची धमकी दिली. किरण चिंचकर यांनी असाही दावा केला आहे की, अंमली पदार्थ विरोधी पथक आणि एनसीबी या दोघांनीही त्यांना वारंवार बोलावले आणि पैशांची मागणी केली. यामुळे त्यांचे पती मानसिक तणावाखाली होते आणि याच तणावातून त्यांनी आत्महत्या केली.

एनसीबीचे मुंबई विभागीय संचालक अमित घावटे यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, एनसीबी मुंबईने जानेवारी 2025 मध्ये बेलापूर येथून कोकेन आणि इतर अंमली पदार्थ जप्त केले होते आणि जुलै 2025 मध्ये ह्यएनडीपीएसह्ण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. नवीन चिंचकर याला मलेशियाहून परत आणून अटक करण्यात आली आणि एकूण नऊ व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले. तसेच नवीन चिंचकर चालवत असलेल्या एका आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ टोळीचा (सिंडिकेटचा) पदार्फाश करण्यात आला आणि आर्थिक तपासादरम्यान चिंचकरच्या मालकीची 10.6 कोटी रुपयांची मालमत्ता गोठवण्यात आली, असा दावा अमित घावटे यांनी केला. दरम्यान, एनसीबीच्या तपासावर आधारित गुन्हा मुंबई ईडीने दाखल केला आहे. त्यांच्या मते संपूर्ण प्रक्रियेदरम्यान एनसीबीने कायद्याचे काटेकोरपणे पालन केले असून कोणतेही बेकायदेशीर कृत्य करण्यात आलेले नाही.

## 3 एप्रिलपासून दहिसर-मिरा भाईंदर मेट्रो धावणार

■ **वसई। प्रतिनिधी,**

भाईंदर आणि दहिसर परिसरातील नागरिकांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून प्रतीक्षा असलेली मेट्रो सेवा अखेर 3 एप्रिलपासून सुरू होणार असून या प्रकल्पामुळे प्रवास अधिक जलद आणि सोयीस्कर होणार आहे. मिरा–भाईंदर शहराला मुंबईशी जोडणाऱ्या महत्वाच्या दहिसर–मिरा भाईंदर मेट्रो मार्गिकेचे पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून, 3 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता या मेट्रोला हिरवा कंदील दाखवण्यात येणार आहे. या उद्घाटन सोहळ्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार उपस्थित राहणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. तसेच इतर मान्यवरही उपस्थित राहणार आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सुमारे सात वर्षांपूर्वी या मेट्रो प्रकल्पाचे काम हाती घेतले होते. या मार्गिकेचे काम दोन टप्प्यात करण्यात आले असून, पहिल्या टप्प्यात दहिसर ते काशिगाव दरम्यानचे काम पूर्ण झाले आहे. पुढील टप्प्यात काशिगाव ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानपर्यंत मेट्रो धावणार आहे. ही मेट्रो सेवा मार्च महिन्यात सुरू होणार असल्याचे सांगितले जात होते. मात्र, काही तांत्रिक कारणांमुळे उद्घाटन लांबले होते.

## न्यायाधीशांना फसवणाऱ्याला जामतारा येथून अटक

### 10 राज्यांतील 36 गुन्ह्यांशी संबंधित रॅकेटचा झाला पर्दाफाश

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

गेल्या महिन्यात एका सायबर गुन्हेगाराने अत्यंत पद्धतशीरपणे मुंबई उच्च न्यायालयाच्या एका विद्यमान न्यायाधीशांना लक्ष्य करून त्यांची फसवणूक केली होती. क्रेडिट कार्डचे 'रिवॉर्ड पॉइंट्स' रिडीम करण्याच्या बहाण्याने 6.02 लाख रुपयांची फसवणूक केली होती. या फसवणुकीप्रकरणी एका टोळीतील 25 वर्षीय आरोपीला पोलिसांनी झारखंडमधील जामतारा येथून अटक केली आहे. मझहर आलम इस्राइल मियाँ असे आरोपीचे नाव असून त्याच्या अटकेमुळे अशा पद्धतीने गुन्हे करण्याच्या पद्धतीचाही पदार्फाश झाला आहे. महत्त्वाचे म्हणजे मझहर मियाँ पोलिसांच्या हाती न लागण्यासाठी सतत वेगवेगळी सिम काड्र्स वापरत होता आणि गुन्हा केल्यानंतर ती सिम काड्र्स त्वरित बंद करून टाकत असे. तपासादरम्यान असेही समोर आले आहे की, या आरोपीचा देशभरातील 10 वेगवेगळ्या राज्यांमध्ये नोंदवल्या गेलेल्या किमान 36 गुन्हेगारी प्रकरणांशी संबंध आहे. कफ परेड पोलिसांनी जामतारा सायबर सेलच्या मदतीने टेक्निकल सर्विलांस, डिजिटल व्यवहारांचा मागोवा आणि प्रत्यक्ष पाळत या तिन्ही पद्धतींचा वापर करून आरोपीचा शोध घेतला.

पोलिसांच्या माहितीनुसार, या घटनेची सुरुवात 28 फेब्रुवारी रोजी झाली. त्यावेळी संबंधित न्यायाधीशांनी आपल्या क्रेडिट कार्डचे रिवॉर्ड पॉइंट्स रिडीम करण्यासाठी बँकेच्या ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता. बँकेचा अधिकृत हेल्पलाइन क्रमांक सतत व्यस्त येत असल्याचे पाहून त्यांनी ऑनलाइन संपर्क क्रमांक शोधला. मात्र, त्यांना मिळालेला क्रमांक बनावट निघाला आणि येथूनच या संपूर्ण फसवणुकीच्या कटकारस्थानाची सुरुवात झाली होती.

न्यायधीशांनी बनावट हेल्पलाइन क्रमांकावर कॉल केल्यानंतर फसवणूक करणाऱ्यांनी बँकेचे ग्राहक सेवा अधिकारी असल्याचे भासवून न्यायाधीशांचा विश्वास संपादन केला होता. त्यानंतर त्यांनी व्हॉट्सॲपद्वारे न्यायाधीशांना 18 एमबी आकाराचे एक ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी एक लिंक पाठवली. ही लिंक एका 'मालिशिअस एपीके फाईल'शी (संगणक प्रणालीला हानी पोहोचवणाऱ्या फाईलशी) जोडलेली होती. ती फाईल डाउनलोड करताच फसवणूक करणाऱ्यांना न्यायाधीशांच्या मोबाइल फोनचा आणि संबंधित सर्व आर्थिक माहितीचा अनधिकृत ॲक्सेस मिळाला होता. ती फाईल न्यायाधीशांच्या 'आयफोन'वर सुसंगत नसल्यामुळे फसवणूक करणाऱ्यांनी त्यांना अँड्रॉइड फोन वापरण्याची सूचना दिली होती. आरोपींच्या सूचनांवर विश्वास ठेवून न्यायाधीशांनी त्यांचे सिम कार्ड त्यांच्याकडे घरकाम करणाऱ्या व्यक्तीच्या अँड्रॉइड फोनमध्ये टाकले आणि ते ॲप्लिकेशन डाउनलोड केले होते.




फसवणूक करणाऱ्यांनी न्यायाधीशांना त्या ॲप्लिकेशनमध्ये त्यांचे क्रेडिट कार्डचे तपशील भरण्याची सूचना दिली होती. संबंधित माहिती ॲप्लिकेशनमध्ये भरताच अवघ्या काही मिनिटांतच चार वेगवेगळ्या व्यवहारांद्वारे त्यांच्या खात्यातून एकूण 6.02 लाख रुपये काढून घेण्यात आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच न्यायाधीशांनी तत्काळ आपले कार्ड बंद केले आणि सायबर गुन्हे हेल्पलाइनवर तक्रार दाखल केली होती. त्यानंतर कफ परेड पोलीस ठाण्यात 'भारतीय न्याय संहिता' कलम 318 आणि 319, तसेच 'माहिती तंत्रज्ञान कायद्या'च्या संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान पोलिसांना असे आढळून आले की, आरोपी फसवणूक करताना विविध राज्यांतून खरेदी केलेल्या अनेक 'सिम काड्र्स'चा वापर केला होता. प्रत्येक फसवणुकीच्या घटनेनंतर आरोपी सिम कार्ड बंद करत होता. ज्यामुळे त्याचे ठिकाण आणि ओळख शोधणे अत्यंत कठीण जात होते. मात्र उपलब्ध डिजिटल पुराव्यांचे धागेदोरे जुळवून अखेर आरोपीचे ठिकाण 'जामतारा' असल्याचे शोधून काढले. 'जामतारा' हे असे ठिकाण आहे, ज्याला देशाची ''फिशिंगची राजधानी'' म्हणून दीर्घकाळापासून ओळखले जाते.

कफ परेड पोलिसांच्या एका पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने संयुक्त मोहीम राबवत सदर आरोपीला अटक केली. पुढील चौकशीत असे निष्पन्न झाले की, पोलिसांच्या नजरेतून सुटण्यासाठी आरोपी फसवणुकीद्वारे मिळवलेली रक्कम 'ऑनलाइन वॉलेट्स' आणि अनेक स्तरांवरील व्यवहारांचा वापर करून अत्यंत वेगाने विविध खात्यांमध्ये हस्तांतरित करत होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीशी संबंधित असलेल्या एका 'ॲमेझॉन वॉलेट'मधील सुमारे 4 लाख रुपयांची रक्कम गोठवण्यात आली आहे, तर उर्वरित रक्कम इतर वॉलेट्समध्ये हस्तांतरित करण्यात आली असून त्या वॉलेट्सचा तपास सध्या सुरू आहे.

या संपूर्ण गुन्हेगारी जाळ्यात इतर व्यक्तींचाही सहभाग असल्याचा पोलिसांना संशय असून त्यांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सध्या सुरू आहेत. तसेच तपास अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे की, या गुन्ह्यात वापरलेली कार्यपद्धती जामतारा येथून चालणाऱ्या सायबर फसवणुकीच्या प्रस्थापित पद्धतींशी मिळतीजुळती आहे. या पद्धतीमध्ये बनावट हेल्पलाइन क्रमांक आणि संकेतस्थळांच्या माध्यमातून लोकांना जाळ्यात ओढले जाते आणि त्यानंतर काही 'विविध ॲप्लिकेशन्स'द्वारे मोबाइल उपकरणांमध्ये अनधिकृत प्रवेश मिळवून त्यांची आर्थिक माहिती चोरली जाते. हे ठग लोकांच्या घाईचा आणि विश्वासाचा गैरफायदा घेतात. त्यामुळे आर्थिक व्यवहार करताना अत्यंत सावधगिरी बाळगणारे लोकही अनेकदा त्यांच्या जाळ्यात अडकतात, असे पोलिसांनी विशेष भर देऊन सांगितले.

## पुणे विमानतळावर 26.80 कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त, सीमाशुल्क विभागाची कारवाई

### संत्र्याच्या खोक्यातून चालू होती तस्करी

■ **पुणे। प्रतिनिधी,**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाने ड्रग्ज तस्करीचा एक मोठा डाव उधळून लावला आहे. थायलंडहून चक्क 'मँडरिन ऑरेंज'च्या बॉक्समध्ये लपवून आणलेला तब्बल ७६ किलो 'हायड्रोपोनिक गांजा' जप्त करण्यात आला. आंतरराष्ट्रीय बाजारात याची किंमत २६.८० कोटी रुपये असून, अत्यंत चलाखीने व्हॅक्यूम सीलबंद पाकिटांत हे ड्रग्ज दडवले होते. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली असून तस्करीचे आंतरराष्ट्रीय रॅकेट उघड होण्याची शक्यता आहे.

**असा आखला प्लान**

ही संपूर्ण खेळी अगदी स्मार्ट पद्धतीने आखली गेली होती. माल संत्र्याच्या फोडी (मँडरिन ऑरेंज) असल्याचं सांगून थमाकीलच्या बॉक्समध्ये पॅक करून आणण्यात आला होता. बाहेरून सगळं अगदी नॉर्मल दिसत होतं, त्यामुळे सुरुवातीला कोणालाही संशय येणं कठीण होतं. पण स्कॅनिंग करताना अधिकाऱ्यांना काहीतरी गडबड असल्याचा अंदाज आला.




**गांजा असल्याचं समोर आलं**

यानंतर त्यांनी एक बॉक्स उघडून पाहिला आणि खरी गोष्ट समोर आली. आत सीलबंद टिनचे डबे ठेवलेले होते. सुरुवातीला त्या डब्यांमध्ये पांढऱ्या रंगाची पावडर दिसत होती. मात्र, नीट तपासणी केल्यानंतर लक्षात आलं की ही पावडर फक्त वरवरची होती. त्या पावडरच्या आत व्हॅक्यूम सीलबंद प्लास्टिक पॅकेट्समध्ये गांजा लपवून ठेवण्यात आला होता.

**किंमत २६.८० कोटी**

यानंतर सगळे बॉक्स तपासले असता एकूण ७६.५८ किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला. आंतरराष्ट्रीय काळ्या बाजारात या मालाची किंमत जवळपास २६.८० कोटी रुपये असल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

**एका आरोपीला अटक**

या प्रकरणी सीमाशुल्क विभागाने तातडीने कारवाई करत एका आरोपीला अटक केली आहे. हा माल नेमका कोणासाठी आणला जात होता, आणि यामागे कोणतं मोठं रॅकेट आहे का, याचा आता सखोल तपास सुरू आहे.

एकंदरीत पाहता, ''खाद्यपदार्थ'' नावाखाली मोठ्या प्रमाणात ड्रग्ज तस्करी करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, अधिकाऱ्यांच्या वेळीच केलेल्या कारवाईमुळे हा डाव पूर्णपणे उधळला गेला. त्यामुळे पुन्हा एकदा विमानतळावरील सुरक्षा यंत्रणा किती सतर्क आहे, हे समोर आलं आहे.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# साहाय्य कुणासाठी?



इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल यांच्यात युद्ध चालू आहे. या युद्धात अमेरिका आणि इस्रायल यांनी इराणचे सैन्य तळ अन संरक्षण व्यवस्थेचे साहित्य नष्ट करण्यासह आता इराणी तेल शुद्धीकरण कारखाने आणि तेल साठ्याच्या टाक्या यांनाही लक्ष्य केले आहे. युद्धामध्ये इराणचे शेकडो नागरिक मारले गेले आहेत, तसेच इराणची मोठ्या प्रमाणात आर्थिक हानीही झाली आहे. यामुळे भारतातील मुसलमान समाजाचे इराणविषयी हृदय द्रवले आणि त्यांनी इराणला साहाय्य म्हणून पैसे, सोने-नाणे अन अन्य साहित्य पाठवण्यास प्रारंभ केला आहे. भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश येथील हिंदु समाजावर गत काही वर्षांत अनेक संकटे आली. या संकटांच्या वेळी भारतीय मुसलमान साहाय्य करण्यासाठी कधी पुढे आल्याचे लोकांना आठवते का? खामेनी मारले गेल्यानंतर सर्वांत प्रथम काश्मीरमधून निषेध झाला. इराणमधील स्वतःचे धर्मबांधव असाहाय्य आहेत, या दृष्टीने स्थानिक मुसलमानांनी साहाय्य पाठवण्यास प्रारंभ केला. मुसलमानांनी गटागटाने हे साहाय्य एकत्र केले, तर काहींनी थेट इराण सरकारकडे साहाय्य पाठवले आहे. काश्मीर खोर्‍यातून १७ कोटी ९१ लाख रुपयांचे साहाय्य इराणला पाठवले आहे, त्यातील ९५ लाख रुपये एकट्या बडगाम जिल्ह्यातून आहेत. मानवतावादी साहाय्याच्या नावाखाली गोळा केलेल्या पैशांचा वापर भारतविरोधी कारवाया आणि फुटीरतावाद यांना खतपाणी घालण्यासाठी केला जाऊ शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. स्थानिक अन्वेषण यंत्रणेला जकात आणि देणगी यांच्या नावाखाली गोळा करण्यात येत असलेल्या रकमेचा मोठा हिस्सा ही रक्कम गोळा करणार्‍यांच्या स्वतःच्या खिशात जात आहे, असे वाटते. काही वर्षांपूर्वी मौलवी बरकाती यांनीही लोकांकडून देणगी घेऊन अनुमाने दीड कोटी रुपयांचा उपयोग आतंकवादी कारवायांसाठी निधी म्हणून आणि ह्यमनी लाँड्रिंगह्णसाठी केला होता. अन्वेषण यंत्रणा या प्रकरणाशी याचा संबंध जोडत आहेत. त्यामुळे निश्चितच हे धोकादायक आहे. भारत सरकारने इराणला साहाय्य करणे, हा देशाच्या व्यापक धोरणाचा एक भाग असू शकतो; मात्र येथील मुसलमानांनी त्यासाठी पुढाकार घेऊन प्रयत्न करणे, तसेच साहाय्य करण्याच्या नावाखाली पुन्हा आतंकवादी कृत्ये करण्यासाठी हा निधी वळवणे, हा मुसलमान आणि देश या दोघांचाही विश्वासघात आहे. यापूर्वी काश्मीरमध्ये आतंकवादी कारवायांसाठी थेट पाककडूनच पैसे दिले जात होते. काश्मीरमध्ये पाकव्याप्त काश्मीरमधील कार्यरत आतंकवादी गटांकडून कारवाया केल्या जात होत्या. त्याचे प्रमाण गत ३-४ वर्षांपासून न्यून झाले असले, तरी त्यापूर्वी काश्मीर खोर्‍याने भयावह आतंकवादी कारवायांचा अनुभव घेतला आहे. प्रतिदिन आतंकवादी आक्रमणे, त्यामध्ये सैनिक, पोलीस, सामान्य नागरिक आणि विशेषतः हिंदू यांच्या हत्या केल्या जात होत्या. काश्मिरी हिंदूंना तर रहात्या घरातून हुसकावून लावण्यात आले, काहींना परिचित मुसलमानांकडून ठार करण्यात आले, अनेक काश्मिरी मुली-महिलांना शेजारी रहाणार्‍या मुसलमानांनी सामूहिक बलात्कार करून त्यांची हत्या केली. काश्मिरी हिंदूंवर स्थानिक धर्मांध आणि जिहादी यांनीच अत्याचार केले होते. त्या वेळी अन्य मुसलमानांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न का केला नाही? अर्थातच याचे कारण म्हणजे धर्मांधांच्या दृष्टीने हिंदू हे ह्यकाफीरह्ण आहेत. येथे मानसिकतेचा आणि मुख्य म्हणजे विचारसरणीचा प्रश्न आहे. जो देश त्यांच्या धर्मबांधवांचा आहे, त्यांच्या धमार्ला मानर्णार्‍यांचा आहे, त्यांनाच साहाय्य केले जाते. त्याचप्रमाणे त्यांच्या धमार्तील व्यक्ती भलेही ती गुंड, अत्याचारी, अन्य धर्मियांवर अत्याचार करणारी असली, तरी ती जेव्हा संकटात सापडते, तेव्हा तिला साहाय्य करायचे, हे यांचे धर्मबंधुत्व! त्यामुळे दीड लाखांहून अधिक सैनिक काश्मीरमध्ये नियुक्त केले, सैन्याने शोधमोहीम राबवली, तरी आतंकवादी त्यांच्या हातात सापडत नाहीत, ते पळून जाण्यात यशस्वी होतात किंवा बरेच दिवस एखाद्याकडे लपून बसतात. त्यामुळे काश्मीरमधील आतंकवाद संपुष्टात आणण्यासाठी अनेक वर्षे लागली आहेत. काश्मीरमध्ये स्थानिकांना आतंकवादी कारवाया करण्यासाठी पाठिंबा देर्णार्‍यांचे पाकमधील ह्यकमांडरह्ण मारले जात आहेत, सीमा अधिक भक्कम केल्या जात आहेत. त्यामुळे पाककडून आतंकवादी कारवायांसाठी पैशाचा आणि जिहाद्यांचा पुरवठा करणे कठीण झाले आहे. आतंकवाद्यांची आर्थिक नाडी आवळल्यामुळे ते कारवाया चालूच ठेवण्यासाठी पयार्यी मार्ग शोधत आहेत. त्यामुळे अशा प्रकारे निधी गोळा करण्यात येत असल्याचे उघड होत आहे. केंद्र सरकारने जिहादसाठी निधी गोळा करणार्‍यांवर बारीक लक्ष ठेवून त्यांची यंत्रणा उद्ध्वस्त करणे आवश्यक आहे. इराणचा विषय घेतला, तर इराणने इस्रायलवर जी क्षेपणास्त्रे डागली, त्यावर भारताला धन्यवाद देणारे लिखाण होते. भारत आणि इस्रायल यांचे चांगले संबंध आहेत. त्यामुळे हा इराणकडून दोघांच्या संबंधात खोडा घालण्याचा प्रयत्न नव्हता का? इराणने हॉर्मुझच्या सामुद्रधुनीत आलेल्या व्यापारी नौकांना घेरण्याचा प्रयत्न केला होता, त्यामध्ये भारतीय नौकासुद्धा होत्या. अमेरिकेने या सामुद्रधुनीत सुरक्षा पुरवण्याविषयी हात वर केले आणि सैन्यबळाच्या दृष्टीने भक्कम असलेल्या पाश्चात्त्य विकसित देशांपैकी एकही देश या ठिकाणी त्यांच्या युद्धनौका पाठवण्यास सिद्ध नव्हता. त्यामुळे इराणच्या पथ्यावर पडले आणि त्याने तेथून प्रवास करायचा असल्यास व्यापारी नौकांकडून खंडणी वसूल करण्यास प्रारंभ केला होता. भारताने कूटनीतीने हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला; मात्र त्याला इराण बधला नाही. जेव्हा भारताची बलाढ्य युद्धनौका या ठिकाणी भारतीय नौकांच्या सुरक्षेसाठी पाठवण्यात आली, तेव्हा कुठे इराण बधला आणि त्याने भारतीय नौकांचा रस्ता मोकळा केला, म्हणजे जोपर्यंत भारत त्याची शक्ती दाखवत नव्हता, तोपर्यंत इराण भले त्याला साहाय्य करण्यात येऊनही दाद देत नव्हता. हीसुद्धा इराणची धर्मांध वृत्ती नाही का ? इराणला भारत सरकारने साहाय्य केले, तरी अनेक भारतियांच्या मनात जो देश आतंकवादी कारवाया करण्यासाठी निधी पुरवतो, शस्त्रास्त्रे पुरवतो, आखातात आतंकवादी संघटना पोसून दहशत निर्माण करतो, त्या देशाला खरेच साहाय्य केले पाहिजे का ? जो देश त्याच्या क्षेत्रात इतरांवर दादागिरी करतो, त्याला साहाय्य करणे, म्हणजे आतंकवादाला साहाय्य करण्यासारखेच आहे. असो. भारतापुरता विचार करायचा झाल्यास इराणसाठी साहाय्य स्थानिक गटांकडून नव्हे, तर सरकारी नियंत्रणातच गोळा करणे आवश्यक आहे. नाही तर ह्यआतंकवादाचे भूतह्ण पुन्हा जागे होण्यास वेळ लागणार नाही!

# कार्यकक्षा समजून घेतल्यास गोंधळ टळेल



**भारतीय पोलीस सेवेतील अधिकार्‍यांना निलंबित करण्यासंदर्भातील नियमावली 1969 मध्येच अंमलात आणण्यात आली आहे. 'द ऑल इंडिया सर्व्हिसेस (डिसिप्लिन अँड अपील) रूल्स, 1969 च्या नियम 3 मध्ये अधिकार्‍यांना निलंबित करण्यासंदर्भातील तरतुदी आहेत. नियम 3 (1) मध्ये राज्य सरकारला किंवा केंद्र सरकारला गरजेनुसार अधिकार्‍याला निलंबित करण्याचा अधिकार आहे, पण तो सभापती किंवा उपसभापतींना नाही. त्यासाठी कार्यकक्षा समजून घेण्याची गरज आहे.**

सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीवेळी झालेल्या गदारोळानंतर विधान परिषदेच्या उपसभापतींनी तेथील पोलीस अधीक्षक तुषार दोषी आणि इतर संबंधितांना निलंबित करण्याचे निर्देश सभागृहात सरकारला दिले. सातार्‍याचे पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी सातार्‍यात त्यांच्यावर काय प्रसंग ओढावला, याबद्दल सभागृहात सविस्तरपणे निवेदन केले. त्यानंतर उपसभापतींनी सरकारला निर्देश दिले आणि सरकारच्या वतीने उद्योग मंत्री उदय सामंत यांनी ते स्वीकारले. अशा पद्धतीने भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) अधीक्षक दर्जाच्या अधिकार्‍याला निलंबित करण्याचा अधिकार विधान परिषदेच्या उपसभापतींना आहेत का, असा प्रश्न या घटनेनंतर सभागृहात सत्ताधारी आणि विरोधी बाकांवरील सदस्यांनी अधिवेशन काळात उपस्थित केला आणि हा विषय चर्चेत आला. भारतीय राज्यघटनेने कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्याय मंडळ अशा तीन भागांत सत्तेची विभागणी केली आहे. यामध्ये तिन्ही मंडळाची कार्ये काय आहेत, हे सविस्तरपणे राज्यघटनेमध्येच नमूद करण्यात आले आहे. कोणीही एकमेकांच्या कामात हस्तक्षेप करू नये, यासाठीच सत्तेची विभागणी करण्यात आली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेमध्ये सांगितले. त्यांच्या निवेदनातून हेच सूचित करण्यात आले की पोलीस अधीक्षकांना निलंबित करण्याचे उपसभापतींनी दिलेले निर्देश हे त्यांच्या अधिकार कक्षेच्या बाहेर आहेत. असे निर्देश देणे हे कार्यकारी मंडळाच्या अधिकारांमध्ये कायदे मंडळाने केलेला हस्तक्षेप आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर उपसभापतींना असे निर्देश देता येतात का, राज्यघटनेमध्ये, कायद्यांमध्ये काय तरतुदी आहेत याकडे बघितले पाहिजे.

राज्यघटनेच्या सहाव्या भागात राज्यांसंदर्भातील सर्व तरतुदी आहेत. अनुच्छेद 182 ते 186 यामध्ये विधान परिषदेचे सभापती आणि उपसभापती यांची निवड, त्यांचे अधिकार, त्यांना पदावरून दूर करण्याची पद्धती, वेतन व भत्ते या संदर्भातील सर्व तरतुदी आहेत. यापैकी अनुच्छेद 184 (2) मध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की सभागृहाचे कामकाज सुरू असताना सभापती अनुपस्थित असतील, तर सभेच्या कामकाजाबद्दल त्यांचे सर्व अधिकार हे उपसभापती किंवा तालिका सभापती यांच्याकडे असतात. म्हणजेच अधिकारांचा विचार केला तर सभापतींच्या अनुपस्थितीत त्यांचे सर्व अधिकार उपसभापती किंवा जो कोणी त्यावेळी तालिका सभापती म्हणून कामकाजाचे नियमन करीत असेल, त्यांच्याकडे येतात. राज्यघटनेतील याच तरतुदीला पूरक अशी आणखी एक तरतूद महाराष्ट्र विधान परिषद नियमावली, 1960 च्या नियम 9 मध्ये करण्यात आली आहे. या नियमामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, उपसभापती किंवा तालिका सभापती हे सभागृहाच्या कामकाजाचे नियमन करीत असतील, त्यावेळी त्यांना सभापतींप्रमाणेच सर्व अधिकार प्राप्त होतात. वरच्या घटनेमध्ये उपसभापती या त्यावेळी सभापतींच्या आसनावरून कामकाजाचे नियमन करीत होत्या. त्यामुळे त्यांना सभापतींइतकेच अधिकार प्राप्त होतात. आता त्यांनी दिलेले आदेश हे त्यांच्या अधिकारांच्या कार्यकक्षेत येतात का, या प्रश्नाचे उत्तर कायद्यामध्येच शोधावे लागेल.

घटनात्मक पदावरील कोणत्याही व्यक्तीला किंवा अधिकार्‍याला आपले काम कायद्याच्या कार्यकक्षेतच करावे लागते. याचा अर्थ कायद्यामध्ये आवश्यक तरतूद असल्याशिवाय संबंधित व्यक्ती त्याचा वापर करू शकत नाही. राज्यघटनेमध्ये विधान परिषदेच्या सभापतींना किंवा उपसभापतींना पोलीस अधीक्षक दर्जाच्या अधिकार्‍याला निलंबित करण्याचा अधिकार असल्याची स्पष्ट तरतूद सापडत नाही. याच राज्यघटनेतील अनुच्छेद 208 मध्ये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून 1960 मध्ये महाराष्ट्र विधान परिषद नियमावली तयार करण्यात आली. या नियमावलीमध्ये विधान परिषदेचे कामकाज कशा पद्धतीने चालवण्यात आले पाहिजे, सभापती-उपसभापती यांच्याकडे कोणते अधिकार आहेत, या सगळ्याबद्दल सविस्तरपणे तरतुदी करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे या नियमावलीमध्येही अशा पद्धतीने कोणालाही निलंबित करण्याबद्दलची स्पष्ट तरतूद आढळत नाही. जर नियमावलीमध्ये स्पष्ट तरतूद नसेल, तर सभापतींना त्या विषयात अधिकार आहेत का, असा प्रश्न उपस्थित होतो आणि तोच काही सदस्यांकडून विचारण्यात आला.

विधान परिषदेच्या कामकाजाचे नियमन करण्यासाठी सभापती, उपसभापती आणि तालिका सभापती असले तरी कामकाज हे पूर्वनिश्चित कार्यक्रमानुसार होत असते. विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत ठरल्यानुसार दोन्ही सभागृहांचे अधिवेशन आणि कामकाज होत असते. यामध्ये सभापतींनी बोलावलेली गटनेत्यांची बैठकही महत्त्वाची भूमिका निभावते. सभापतींना विधान परिषदेच्या कामकाजाचे नियमन करताना सत्ताधारी, विरोधक यांच्यासोबत विधिमंडळ कामकाज मंत्री या सर्वांचा विचार करावा लागतो. उदाहरण म्हणून बघूया की, सभागृहात गोंधळ घातल्याच्या कारणावरून जेव्हा सदस्यांना निलंबित करण्याचे काम सभापती करतात, त्यावेळी आधी तसा ठराव हा विधिमंडळ कामकाज मंत्र्यांकडून सभागृहात मांडला जातो. त्या ठरावावर मतदान होऊन तो मंजूर झाल्यानंतर सभापती सदस्यांना निलंबित करण्याचे आदेश देऊ शकतात. म्हणजे त्यांना अधिकार असले तरी आधी तसा ठराव सभागृहाने करावा लागतो.

विधान परिषद नियमावलीच्या नियम 23 (1) मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की सभागृहाचा निर्णय घेण्यासाठी तशा स्वरुपाचा प्रश्न सभापतींनी विचारला पाहिजे. म्हणजेच सभापतींनी प्रश्न विचारून त्यावर सभागृहाची मंजुरी आहे की नाही हे पाहून तो निर्णय सभापतींनी घ्यावा. यातून हेच दिसते की सभागृहाची मंजुरी ही जास्त श्रेष्ठ आहे, ती घेण्यासाठी सभापती किंवा उपसभापतींनी नियमावलीनुसार नियोजित काम करायचे असते. या प्रकरणामध्ये तशी मंजुरी घेण्यात आली नाही. उपसभापतींनी थेट सातार्‍याचे पोलीस अधीक्षक यांना निलंबित करण्याचे निर्देश दिले. सभागृहाला तसे हवे होते का, असा प्रश्न यामुळे अनुत्तरित राहतो, याकडेही लक्ष दिले पाहिजे. आणखी एक म्हणजे नियमावलीच्या 23 (2) मध्ये ठरावाचा विषय हा नेमका आणि मुद्देसूद असला पाहिजे, असे म्हटले आहे. वरील प्रकरणात निर्देश देताना उपसभापतींनी सातार्‍याचे अधीक्षक आणि इतर संबंधितांना निलंबित करण्याचे निर्देश दिले. यामध्ये इतर संबंधित नेमके कोण, त्यांची नावे काय हे सुद्धा सांगणे अपेक्षित होते. पण तसे झालेले नाही, हे समजून घेतले पाहिजे.

भारतीय पोलीस सेवेतील अधिकार्‍यांना निलंबित करण्यासंदर्भातील नियमावली 1969 मध्येच अंमलात आणण्यात आली आहे. 'द ऑल इंडिया सर्व्हिसेस (डिसिप्लिन अँड अपील) रूल्स', 1969 च्या नियम 3 मध्ये अधिकार्‍यांना निलंबित करण्यासंदर्भातील तरतुदी आहेत. नियम 3 (1) मध्ये राज्य सरकारला किंवा केंद्र सरकारला गरजेनुसार त्याला किंवा तिला निलंबित करण्याचा अधिकार आहे. आयपीएस दर्जाच्या अधिकार्‍याला निलंबित करण्याचा अधिकार सरकारला म्हणजेच कार्यकारी मंडळाला आहे, हे यातून स्पष्ट होते. विधान परिषदेच्या सभापती किंवा उपसभापतींना असा अधिकार असल्याचा उल्लेख या नियमावलीमध्येही आढळत नाही, याचाही विचार केला पाहिजे.

नैसर्गिक न्यायाचे तत्त्व आपण देश म्हणून स्वीकारले आहे. याच नैसर्गिक न्यायाचा एक भाग आहे Audi Alteram Partem. याचा साधा अर्थ असा आहे की बाजू ऐकून घेतल्याशिवाय कोणावरही टीका करू नये. म्हणजेच दुसरी बाजूही ऐकून घेतली पाहिजे. सातार्‍याच्या प्रकरणामध्ये जे काही घडले त्याची एक बाजू तेथील पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी सभागृहात सांगितली. पण त्याची दुसरी बाजू काय आहे, हेसुद्धा सभागृहापुढे आले पाहिजे होते. म्हणजेच तेथील पोलीस अधीक्षक यांचे म्हणणे काय हेसुद्धा समजून घेतले पाहिजे होते. ते समजून न घेताच त्यांच्यावर कारवाई करणे म्हणजे नैसर्गिक न्यायाचे तत्त्व डावलण्यासारखेच आहे. जर उपसभापतींना निवाड्याचे काम करायचे असेल, तर त्यांनीसुद्धा नैसर्गिक न्यायाचे तत्त्व पाळले पाहिजे. सातार्‍याच्या प्रकरणामध्ये उपसभापतींनी दिलेले निर्देश सभापती राम शिंदे यांनी रद्द केले आहेत. पुढील काळात तरी असे विषय अधिक गंभीरपणे आणि कायद्याच्या चौकटीत राहूनच हाताळले गेले पाहिजेत. आपल्या अधिकारांची कार्यकक्षा समजून घेऊन निर्णय घेतले गेल्यास भविष्यात असा गोंधळ निर्माण होणार नाही. राज्यघटनेने आखून दिलेले सत्तेच्या विभागणीचे महत्त्व यासाठीच अनन्यसाधारण आहे.

# ज्येष्ठांभोवतीचा सायबर सापळा



वेगाने बदलणार्‍या डिजिटल युगात तंत्रज्ञानाशी पुरेशी गती साधू न शकल्याने ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणात ऑनलाइन फसवणुकीचे सहज बळी ठरत आहेत. 'डिजिटल अरेस्ट'सारख्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असून भीती, अज्ञान आणि निवृत्तीचा पैसा यामुळे या वयोगटाला लक्ष्य केले जात आहे.

**ज्येष्ठांकडे हे नंबर हवेतच**

सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे काही महत्त्वाचे संपर्क क्रमांक ज्येष्ठांकडे असणे गरजेचे आहेत. जसे सायबर फसवणुकीबाबत तक्रार करण्यासाठी देशपातळीवील १९३०, महाराष्ट्राचा १९४५, बँकांचे नंबर, **https://cybercrime.gov.in** सारखी वेबसाइट ही सर्व माहिती त्यांच्याकडे सहज उपलब्ध असेल, असे पाहिले पाहिजे.

**अशी घ्या काळजी...**

- अशा पद्धतीचे कुठलेही फोन आले, तर त्याला प्रतिसाद देऊ नका.
- कोणी असे फोन करण्यास सांगितले, तर स्पष्ट शब्दांत 'ईमेल पाठवा किंवा पत्राद्वारे कळवा, आम्ही त्याचे उत्तर देतो,' असे सांगा.
- कुठलीही अनोळखी लिंक आली, तर त्यावर क्लिक करू नका.
- अनोळखी नंबरवरून व्हॉट्सअ‍ॅप कॉल आले, व्हिडीओ कॉल कॉल आले, तर अजिबात घेऊ नका.
- वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर अशा प्रकारच्या गुन्ह्यांची माहिती उपलब्ध आहे, ती माहिती तुम्ही समजून घ्या.
- ज्येष्ठांच्या कुटुंबीयांनीही ज्येष्ठ नागरिकांच्या वागण्या-बोलण्यामध्ये काही बदल झाले आहेत का हे समजून घ्यावे.
- त्यांना सायबर फसवणूक, डिजिटल अरेस्ट याबद्दलच्या गुन्ह्यांची माहिती सांगा.
- घाबरून न जाता हे सर्व प्लॅटफॉर्म कसे वापरायचे हे त्यांना समजावून सांगा.

ज्येष्ठ नागरिकांची ऑनलाइन फसवणूक हे आजच्या घडीचे भीषण सामाजिक संकट झाले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या वेगवान बदलांमध्ये मागे राहिलेला हा वयोगट गुन्हेगारांसाठी सर्वांत मोठा 'सॉफ्ट टार्गेट' ठरत आहे. यामागील कारणांचा शोध घेतला, तर सर्वांत ठळक बाब दिसून येते ती, यांच्याकडे असलेला निवृत्तीनंतरचा पैसा आणि तंत्रज्ञानाबद्दले अज्ञान. ज्येष्ठ नागरिक आपल्याला स्मार्ट मोबाइल सहजतेने हाताळताना दिसत असले, तरी सोशल मीडिया कसा वापरायचा, एकूणच मोबाइल वापराचे 'डूज अँड डोन्ट्स' याची त्यांना पुरेशी माहिती नाही. त्यांच्याकडे 'माध्यम साक्षरता' नाही, डिजिटल सुरक्षेचे प्रशिक्षण नाही.

तंत्रज्ञानामध्ये भराभर जे काही बदल होत आहेत, त्या बदलांना जुळवून घेण्याच्या नादात त्यांच्याकडून अनेक चुका होतात. त्यातल्या प्रकर्षाने दिसणार्‍या गोष्टी म्हणजे, सोशल मीडियावरील पोस्ट भराभर एकमेकांना फॉरवर्ड करणे आणि सोशल मीडियावरील गोष्टींवर चटकन विश्वास ठेवणे. जे कुठेतरी छापलेले आहे त्यावर विश्वास ठेवला पाहिजे, असा त्यांचा समज आहे. त्यामुळे आपल्याकडील कंन्टेंट तपासून पाहिले पाहिजे, विचारले पाहिजे किंवा या फसवणुकीच्या गोष्टी असू शकतात, याची जाणीव त्यांना नसते. आणि इथेच गुन्हेगारांचे फावते.

ज्येष्ठ नागरिकांबाबत घडणार्‍या ऑनलाइन फसवणुकीत 'डिजिटल अरेस्ट' हा सर्वांत भयावह प्रकार आहे. पोलिस, सीबीआय, कस्टम, रिझर्व्ह बँक आदी सरकारी संस्थांबद्दल आधीच सर्वसामान्यांच्या मनात एक भीती असते. हे सायबर गुन्हेगार नेमक्या याच नावांचा वापर करून ज्येष्ठांना भीती दाखवतात. त्यातच ईडीसारख्या संस्थेची तर दहशतच अलीकडच्या काळात निर्माण झाली आहे. ही संस्था काहीही करू शकते, कोणालाही अटक करू शकते, हे लोकांनी अनुभवले आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक या बनावाला बळी पडतो.

'डिजिटल अरेस्ट'बरोबरच त्यांच्यासोबत वेगवेगळे गुंतवणूक घोटाळेदेखील होत आहेत. त्यामध्ये या ज्येष्ठ नागरिकांना गुंतवून त्यांच्याकडून पैसे ट्रान्सफर करून घेणे हा त्यातला एक महत्त्वाचा भाग आहे. निवृत्तीनंतर आलेल्या पैशांबाबतचा डेटा अनेक ठिकाणी लीक होतो, हे येथे लक्षात घ्यायला हवे. यात आणखी एक गोष्ट जाणवते ती म्हणजे, अलीकडच्या काळात जे मोठे घोटाळे झालेले आहेत; त्यांचा या फसवणुकीसाठी वापर केला जातो. उदा. जेट एअरवेज बंद झाली, त्यात काय घोटाळे झाले, त्यातील व्यक्तींच्या नावांचा वापर करून, 'या घोटाळ्यामधले काही पैसे तुमच्या अकाउंटला आले आहेत. म्हणून तुमचे खाते आम्हाला गोठवावे लागत आहे.' किंवा 'सोशल मीडियावर तुम्ही मुलांबाबतचा लैंगिक कंन्टेंट पाहिला आहे आणि त्याचे पुरावे आमच्याकडे आहेत. त्याबद्दल तुम्हाला अटक होऊ शकते,' अशी भीती दाखवल्यामुळे लोक घाबरून जातात.

अशा प्रकरणांत ज्येष्ठांना तशी भीतीच घातली जाते. ही गोष्ट तुम्ही कोणालाही, अगदी तुमच्या मुलांनाही कळवली, तरी तुमच्यासोबत तुमच्या मुलांनाही आम्ही अटक करू. 'तुमच्या सर्व कुटुंबाला यातून धोका आहे,' असे सांगून त्यांना सतत कॅमेर्‍यासमोर बसवून ठेवले जाते. एक अशीच केस आमच्याकडे आली होती. त्यात नवरा-बायको दोघेही ज्येष्ठ नागरिक होते. महत्त्वाचे म्हणजे ते व्यावसायिक होते. जवळपास साडेसहा कोटी रुपये त्यांनी समोरच्या व्यक्तीला दिले. आपली होती नव्हती ती मालमत्ता विकून त्यांनी पैसे दिले. स्कॅम्समधून तुमच्या बँक खात्यात काही पैसे आले आहेत, असे समोरच्या व्यक्तीने सांगितले होते. त्याने यासाठी सांगितलेल्या रकमादेखील खर्‍या होत्या.

'कारवाई टाळायची असेल, तर हे पैसे तुम्हाला आत्ताच्या आत्ता ट्रान्स्फर करावे लागतेल. ते पैसे ट्रान्सफर केल्यानंतर हे सगळे प्रकरण मिटवण्यासाठी तुम्हाला पैसे द्यावे लागतील. नाही तर तुमच्या परदेशात असेल्या मुलाला आम्हाला यात गुंतवावे लागेल. त्याचा व्हिसा रद्द होईल. आम्ही आंतरराष्ट्रीय स्तरावर ही माहिती जाहीर करू,' अशा धमक्या त्यांना दिल्या. त्यामुळे त्यांनी ही गोष्ट कुणालाच सांगितली नाही. आणि शेवटी अशी परिस्थिती आली की द्यायला पैसेच उरले नाहीत. त्यानंतर त्यांनी ही गोष्ट मित्राला सांगितली. तेव्हा हे प्रकरण 'डिजिटल अरेस्ट'चे असल्याचे समजले. त्यानंतर ते पोलिसांकडे गेले. तिथून ही केस आमच्याकडे आली. आम्ही त्यांना मदत केली, समुपदेशन केले. पोलिसांकडून काही रक्कम गोठवण्यात आली, पण ती फारच तोकडी आहे. ज्येष्ठ नागरिकांना भीती दाखवली जाते. अनेकांनी आम्हाला सांगितले की त्यांना हिप्नोटाइज झाल्यासारखे झाले. गुन्हेगार सतत मोबाइल किंवा लॅपटॉप सुरू ठेवायला सांगतात. त्यांच्यासमोर बसून ठेवले जाते. जेवायलासुद्धा त्यांच्यासमोर बसण्याचा आग्रह केला जातो. त्याबाबत कुणाला कळवले तर सगळी बँक खाती गोठवण्याची धमकी दिली जाते. त्यामुळे लोक घाबरून जातात.

लोकांमध्ये जागृती व्हावी यासाठी सरकारकडून प्रयत्न होत आहेत. सर्व माध्यमांत यासंदर्भातल्या बातम्याही येत असतात. मध्यंतरी सरकारने मोबाइल फोनच्या कॉलिंगमध्येसुद्धा याबाबतची ऑडिओ टेप लावलेली होती. तरीसुद्धा घटना थांबलेल्या नाहीत. आपण 'डोअर टू डोअर' कशा पद्धतीने जाऊ शकतो, सूक्ष्म पातळीवर कशा पद्धतीने योजना आखू शकतो, यावर सरकारने विचार करायला पाहिजे. कारण यातून लोकांचे जाणारे पैसे हे प्रचंड आहेत. आपण त्याकडे बघताना केवळ आर्थिक नुकसान बघतो, पण त्या लोकांचे आयुष्य पूर्ण उद्ध्वस्त होते. त्यांच्या मानसिक आरोग्यावरही प्रचंड परिणाम झालेला असल्यास या धक्क्यातून बाहेर येणे कठीण आहे. काही लोकांची आयुष्यभराची प्रॉपर्टी, पैसे गेलेले असतात. पुढे जगायचे कसे हा प्रश्न त्यांच्यापुढे असतो.

छोटे छोटे विभाग टार्गेट करून त्याचा पोलिसांनी, तिथल्या सामाजिक संस्था, शाळा-कॉलेजांनी हे सगळे नीट योजनाबद्धतेने केले, तर आपण लोकांपर्यंत पोहोचू शकतो. असा एक उपक्रम आम्ही मुलुंडमध्ये केला होता. त्यातून ६७-६८ प्रकरणे पुढे आली. या प्रकरणांमध्ये तक्रारच दाखल झालेली नव्हती. लोक फसवले गेल्यानंतरही तक्रार करायला पुढे येत नाहीत; कारण त्यांना 'रिव्हिक्टिमायजेशन'ची भीती वाटत असते. म्हणजे, जेव्हा आम्ही पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी जातो, तेव्हा आम्हालाच बोल लावला जातो. 'तुम्ही सुशिक्षित आहात, तुमच्या हातून हे कसे काय घडलं?' अशी उलटतपासणी सुरू होते. त्यामुळे फसवले गेलेले ज्येष्ठ नागरिक पोलिसांकडे तक्रार करायला बिचकतात. ही गोष्ट उघड होते आणि मुलांपर्यंत जाते, तेव्हा मुलेच त्यांना सांगतात, 'पोलिस ठाण्यात जाऊ नका. नुकसानीने पैसे परत मिळणार नाहीत. उलट तुम्हाला पोलिस ठाण्यात वारंवर चकरा माराव्या लागतील.'

याबाबत आत्ता जे काम सुरू आहे ते खूपच वरवरचे आहे. तसे ते काम न करता त्याची मूळ कारणे काय आहेत, हे कुठून होते आहे, का होते आहे, हे करणारे लोक कोण आहेत, टार्गेट असलेल्या लोकांना यांच्या तावडीतून वाचवण्यासाठी काय केले पाहिजे, यावर पूर्ण विचार करून त्याचा व्यवस्थित 'ॲक्शन प्लॅन' करू शकलो, तरच त्याचा फायदा होऊ शकेल. अन्यथा हे असेच सुरू राहील. या गुन्हेगारांची गुन्ह्याची पद्धत सतत बदलत असते. त्यांचे निरनिराळे स्कॅम येत असतात. काहीतरी नवीन गोष्टी पुढे आणल्या जातात. तत्कालिक काही गोष्टींचाही यासाठी वापर केला जातो. उदा. युद्धजन्य परिस्थितीत तुम्हाला जास्त सिलिंडर हवेत का? अमुक गोष्टी हव्यात का, याच्यासाठी कॉल करून लोकांना फसवले जाते.

सायबर फसवणुकीच्या देशभरातील एकूण तक्रारी पाहिल्या तर महाराष्ट्र पोलिसांनी पैसे बर्‍यापैकी परत मिळवलेले दिसतात. पण, यशस्विता दर वाढवायचा असेल, तर पोलिसांना त्यांच्याकडील मनुष्यबळ, तंत्रज्ञानही काळाबरोबर अपडेट करणे गरजेचे आहे. अशा पद्धतीच्या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी बाहेरून तज्ज्ञांची मदत घेता येईल. फोरेन्सिकमध्ये असलेली मुले किंवा सायबर सिक्युरिटीमध्ये काम करणार्‍या संस्था यांची मदत घेतली आणि या एकत्रित तपासाचा परिणाम साधला गेला, तर तो अधिक वेगाने होऊ शकेल. आज तरुण लोक सायबरमध्ये काम करताना दिसतात, ज्येष्ठ अधिकारी सायबरमध्ये काम करायला तयारच होत नाहीत. कारण त्यांना त्या विषयाचे आकलनच नाही. त्यामुळे या प्रकारच्या तपासासाठी मूलभूत बदल करणे गरजेचे आहे. जसे विशिष्ट केडरमधून आलेले पोलिसच याचा तपास करतील, अशी ताठर भूमिका ठेवण्यापेक्षा बाहेरून तज्ञमंडळींची मदत घेतली आणि खरोखरच गुन्हेगारांना पकडून आणायचे आहे त्यावेळी पोलिसांनी भूमिका बजावली, तर या गुन्ह्यांवर वचक बसवता येईल.

पोलिसांबरोबर बँकिंग क्षेत्रातही बदल होणे गरजेचे आहे. अशाप्रकारच्या फसवणुकीमध्ये बँका सरळ हात वर करतात. रिझर्व्ह बँकेने अलीकडेच यासंदर्भात एक कायदा केलेला आहे. ५० हजारापर्यंतच्या प्रकरणांमध्ये २५ हजार रुपये मिळतील, असे त्यात म्हटले आहे. पण, मग ज्यांचे कोट्यवधी रुपये गेले आहेत त्यांचे काय? त्यांनाही फक्त २५ हजार रुपयेच मिळणार असतील तर त्यांचे नुकसान कसे भरून निघणार? रिकव्हरीचे पैसे मिळवणे हेसुद्धा किचकट काम आहे. ते पैसे मिळवण्यासाठी लोकांना न्यायालयात खेटे मारावे लागतात. या सर्व गोष्टी सोप्या केल्या तर पीडितांना न्याय मिळू शकेल.

या पीडितांचे झालेले मानसिक खच्चीकरण दूर करण्यासाठी मदतकेंद्रे असायला हवीत. दुर्दैवाने आपल्याकडे याच गुन्ह्यांसाठी नव्हे तर कोणत्याच प्रकारच्या गुन्ह्यासाठी मदत केंद्रे नाहीत. आम्ही आता ठाणे पोलिसांच्या मदतीने या प्रयोगाला सुरुवात केली आहे. त्यासाठी सायबर पोलिस ठाण्यात एक केंद्र सुरू केले आहे. मुंबईत दोन ठिकाणी आणि देशपातळीवर आठ ते नऊ ठिकाणी ही केंद्रे सुरू केली आहेत. देशभरात तंत्रज्ञानाच्या अद्ययावतीकरणावर महाराष्ट्रात अधिक भर दिला जातो, खर्च केला जातो आहे, कारण मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. तरीसुद्धा आपण कमी पडतो आहे. कारण या गुन्ह्यांची व्याप्तीच एवढी मोठी आहे की, ते रोखण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नाही.

अशावेळी या सगळ्या फसवणुकीच्या गोष्टींमागचे मानसशास्त्र काय आहे, ते लोकांसमोर मांडणे गरजेचे आहे. ज्येष्ठ नागरिकांचे ग्रुप किंवा कट्टे याठिकाणी जाऊन अशा फसवणुकीबद्दल त्यांच्याशी बोलणे गरजेचे आहे. तुमच्यासाठी मदत कुठे, कशी उपलब्ध आहे, तुम्ही किती तत्परतेने तिथे कॉल करून ती मदत घेऊ शकता, याबद्दलची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवली पाहिजे. यातूनच अशा फसवणुकींवर आपण नियंत्रण मिळवू शकतो.

# नितळ त्वचेकरिता दालचिनीचा वापर



आपल्या एस्प्रेसो कॉफीचा स्वाद वाढवणे किंवा पुलाव, राजमा, इत्यादी पदार्थांचा स्वाद वाढविणारा मसाल्याचा सुवासिक पदार्थ म्हणजे दालचिनी. पण केवळ अन्नपदार्थांचा स्वाद वाढविणे एवढाच दालचिनीचा गुणधर्म नसून, ही दालचिनी आपल्या त्वचेच्या निगेसाठीही अत्यंत गुणकारी आहे. दालचिनीचे औषधी गुणधर्म तर गेल्या कित्येक शतकांपासून मनुष्याला ज्ञात आहेत. दालचिनीचा उपयोग आपली त्वचा नितळ आणि सुंदर बनविण्यासाठीही केला जाऊ शकतो.



**दालचिनीची पूड आणि मध**

दालचिनीची पूड मधात मिसळून चेहऱ्याला लावल्यास मुरुमे पुटकुळ्या कमी होण्यास मदत होते. त्याचबरोबर त्वचा सतत कोरडी पडत असल्यास एक केळे कुस्करावे, व त्यामध्ये एक लहान चमचा दालचिनीची पूड मिसळावी. ह्या पेस्टमध्ये काही थेंब मधही घालावा. हा फेस मास्क चेहऱ्यावर दहा मिनिटे लावून ठेवावा आणि त्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवून टाकावा. या मास्कमुळे चेहऱ्याला आर्द्रता मिळून त्वचेचा कोरडेपणा दूर होतो.



**दालचिनीची पूड आणि ऑलिव्ह ऑईल**

कित्येकदा प्रदूषण, मानसिक तणाव इत्यादी कारणांमुळे चेहऱ्यावर सुरकुत्या पडून अकाली वृद्धत्व आल्याप्रमाणे चेहरा दिसू लागतो. या सुरकुत्या घालविण्यासाठी दोन मोठे चमचे ऑलिव्ह ऑईलमध्ये अर्धा लहान चमचा दालचिनीची पूड मिसळावी. ही पेस्ट चेहऱ्यावर साधारण आठ ते दहा मिनिटे लावून ठेवावी. या पेस्टमधील ऑलिव्ह ऑईल त्वचेमध्ये जिरून त्वचा आर्द्र होते आणि दालचिनीमुळे त्वचेवरील मुरुमे नष्ट होतात. दहा मिनिटे उलटून गेल्यानंतर स्वच्छ ओलसर टॉवेलने चेहरा पुसून काढावा.

**दालचिनीची पूड आणि दही**

त्वचेवरील मृत पेशी काढून टाकून त्वचा मुलायम, चमकदार बनवण्यासाठी दोन मोठे चमचे दालचिनीची थोडी जाडसर पूड घ्यावी. ही पूड फार भरड नेसेल याची काळजी घ्यावी. त्यामध्ये दोन मोठे चमचे मध घालावा आणि ताजे दही घालावे. या पेस्टच्या मदतीने चेहरा स्क्रब करावा. त्यामुळे त्वचेवरील सर्व मृत पेशी निघून जाऊन चेहरा नव्याने उजळेल. त्याचप्रमाणे त्वचेवरील काळे डाग घालवण्यासाठीही दालचिनीची पूड व मधाचा वापर करता येतो.

# स्ट्रेच मार्क्स घालवायचे आहेत? मग इकडे लक्ष द्या

स्ट्रेच मार्क्स हे एक प्रकारचे वण असून, त्वचा ताणली जाऊन मग एकदम सैल पडल्याने ते उद्भवतात. स्ट्रेच मार्क्स शरीरावर जास्त करून कंबर, पोट, मांड्या, दंड, पाठ, इत्यादी भागांमध्ये उद्भवतात. स्त्रियांच्या बाबतीत विशेषत: बाळंतपणानंतर स्ट्रेच मार्क्स दिसून येतात. वजन कमी झाल्याने पण त्वचा सैल पडून त्यावर स्ट्रेच मार्क्स येऊ शकतात.



आजकाल बाजारामध्ये स्ट्रेच मार्क्स घालविण्यासाठी अनेक मलमे, तेले उपलब्ध आहेत. पण या रासायनिक क्रीम्स किंवा तेलांचा वापर करण्यापेक्षा घरच्याघरी काही सोप्या उपायांचा अवलंब करून स्ट्रेच मार्क्स घालविता येऊ शकतात.

■ ह्या सर्व उपायांमध्ये वापरले जाणारे सगळे पदार्थ संपूर्णपणे प्राकृतिक असल्याने त्यांच्यापासून त्वचेला कुठल्याही प्रकारचा अपाय होण्याची शक्यता अगदी कमी असते. थोडीशी साखर, ऑलिव्ह ऑइल, आणि एका लिंबाचा रस मिसळून स्क्रब तयार करावा. हा स्क्रब स्ट्रेच मार्क्स वर लाऊन दहा मिनिटांपर्यंत चोळावा. त्यानंतर कोमट पाण्याने पुसून घेऊन स्क्रब काढून टाकावा.

■ बटाट्याच्या रसामध्ये त्वचेवरील पेशींना पोषक अशी तत्व असतात. तसेच नवीन पेशी तयार होण्यासाठीही बटाट्याचा रस उपयुक्त आहे. एका बटाट्याच्या गोल चकत्या कापून घेऊन त्या चकत्या स्ट्रेच मार्क्स आलेल्या ठिकाणी चोळाव्या. त्या चकत्यांचा रस पाच ते दहा मिनिटे स्ट्रेच मार्क्स वर तसाच राहू देऊन नंतर कोमट पाण्याने पुसून घ्यावा.

■ स्ट्रेच मार्क्स घालविण्याकरिता एरंडेल अतिशय उपयुक्त आहे. एरंडेल स्ट्रेच मार्क्स वर लावून सावकाश गोलाकार मालिश करावी. साधारण पंधरा ते वीस मिनिटे मसाज केल्यानंतर स्ट्रेच मार्क्स वर एक पातळ सुती कपडा ठेवावा आणि हिटिंग पॅड च्या मदतीने शेक घ्यावा. हा उपाय जितके वेळा करता येणे शक्य असेल तितक्या वेळेला करावा. त्यामुळे साधारण महिन्याभरात स्ट्रेच मार्क्स नाहीसे होतना दिसू लागतात.

■ तसेच ॲलो व्हेरा किंवा कोरफड ही स्ट्रेच मार्क्स घालविण्याकरिता उत्तम समजली जाते. पण बाजारातील तयार ॲलो व्हेरा जेल वापरण्यापेक्षा कोरफडीचा ताजा गर वापरणे जास्त चांगले. कोरफडीमधील गर काढून घेऊन स्ट्रेच मार्क्स वर लावावा. हा गर स्ट्रेच मार्क्स वर दोन ते तीन तास लावून ठेवावा आणि त्यानंतर कोमट पाण्याने पुसून टाकावा.

■ जर्दाळूंची पेस्ट बनवून ती स्ट्रेच मार्क्स ला लावल्याने ही स्ट्रेच मार्क्स नाहीसे होण्यास मदत मिळते. दोन ते तीन जर्दाळूंच्या बिया काढून टाकून ते जर्दाळू बारीक वाटून घेऊन त्याची पेस्ट तयार करावी. हे पेस्ट स्ट्रेच मार्क्सवर लावून वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर कोमट पाण्याने पुसून टाकावी. या घरगुती उपायांचा अवलंब केल्याने स्ट्रेच मार्क्स निघून जाऊन त्वचा नितळ आणि चमकदार बनेल.



# कुरकुरीत साबुदाणा-बटाटा चकली

**साबुदाणा-बटाटा चकली हा उन्हाळ्यातील वाळवणाचा एक प्रकार आहे, जो लोकप्रिय आणि खुसखुशीत आहे. सध्या कडक ऊन सर्वत्र पडलं आहे. अशा वातावरणात वाळवणीचा हा पदार्थ नक्कीच बनवता येईल.**

**साहित्य :** साबुदाणा - 1 किलो (रात्रभर भिजवलेले), बटाटे - 2 किलो (उकडलेले), हिरवी मिरचीची पेस्ट - 1 चमचा, मीठ - चवीनुसार

**पाककृती :** साबुदाणा मऊ भिजवून घ्या. बटाटे उकडून थंड झाल्यावर किसून घ्यावेत. भिजवलेला साबुदाणा, किसलेला बटाटा, हिरवी मिरचीची पेस्ट, जिरे आणि मीठ मिक्स करून पीठ मळून घ्यावे. मिश्रण कोरडे वाटत असल्यास पाण्याचा हात लावा. आता चकलीच्या साच्यात तयार सारण भरा. यानंतर प्लास्टिक पेपरवर कागदाच्या चकल्या पाडून घ्याव्यात. यानंतर कडक उन्हात 2 ते 3 दिवस वाळवून घ्या. या चकल्या वर्षभर टिकतात आणि तेलात टाकल्यावर तिप्पट फुलतात.

**अधिक 'टीप :** साबुदाणा मऊ भिजल्यास चकली छान फुलते आणि बटाटे किसल्यामुळे चकल्यांमध्ये गाठी राहत नाहीत.

# वजन घटवण्यास सहाय्यक 'सुपर फूड्स'

वजन घटवण्याच्या एकंदर कवायतीत 'सुपर फूड्स' वापरणे उपयुक्त ठरू लागलेले आहे. सुपर फूड्स अशा अन्नपदार्थांना म्हटले गेले आहे, ज्यांच्या सेवनाने वजन घटवण्यास मदत तर मिळतेच, शिवाय आपल्या शरीराला आवश्यक असे सर्व प्रकारचे पोषणही मिळते.



**बदाम :** बदाम हा अन्नपदार्थ आपल्या शरीरास अनेक प्रकारे उपयुक्त आहे. बदामाच्या सेवनाने बुद्धिमत्ता तीक्ष्ण होते हे ज्ञान फार पूर्वीपासूनचे आहे. तसेच बदामाच्या सेवनाने वजन घटवण्यासही मदत मिळते. बदामामध्ये असलेले एल अर्जेनाईन हे अमिनो ॲसिड व्यायामाच्या वेळी शरीरातील फॅट्स वेगाने वापरले जाण्यास मदत करते. याचमुळे बदामाला नैसर्गिक 'वेट लॉस पिल' असेही म्हटले गेले आहे. या सुपर फूडचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी बदाम आपल्या दैनंदिन आहारात जरूर समाविष्ट करावा. रोज रात्री बदाम पाण्यामध्ये भिजत घालून दुसऱ्या दिवशी सकाळी खावेत. साधारण पाच ते सात बदामांचे सेवन आपल्या दररोजच्या आहारामध्ये असावे.

**ओटमील :** वजन एकदा कमी झाले की ते तसेच टिकवून ठेवणे हेही मोठेच काम असते. त्या कामी ओटमील आपली मदत करू शकते. ओटमीलमध्ये बीटा ग्लुकोन नावाचे फायबर असते, ज्यामुळे ओटमील खाल्ल्यानंतर पुष्कळ वेळपर्यंत पोट भरलेले राहून लवकर भूक लागत नाही. तसेच ओटमीलमध्ये कॅलरीजची मात्रा अतिशय कमी असून अन्य 'रेडी टू ईट' नाश्त्यांच्या पदार्थांच्या मानाने फायबरही मुबलक प्रमाणात असते. साधारण दीड कप ओटमीलमध्ये १५० कॅलरीज असतात.

**संत्रे :** वजन घटवण्यास सहाय्यक अशा सुपर फूड्समध्ये अगदी सहज उपलब्ध असते ते म्हणजे संत्रे. अँटी ऑक्सिडंट्स भरपूर मात्रेमध्ये असणारे हे फळ शरीरातील कोलेस्टेरॉल कमी करण्यास उपयुक्त आहे. संत्र्याच्या नियमित सेवनाने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते व त्वचाही नितळ, सुंदर दिसू लागते. एका पूर्ण संत्र्यामध्ये केवळ ५९ कॅलरीज असतात. संत्र्यामध्ये फायबरही मुबलक असून त्याच्या सेवनाने भूक लवकर शमते.



**कडधान्ये :** मसूर, राजमा यांसारखी कडधान्ये फायबर आणि प्रथिनांनी परिपूर्ण असतात. यामध्ये स्टार्च ही असतो. कडधान्यांच्या सेवनाने वजन घटवत असताना देखील शरीरातील ताकद चांगली टिकून राहते व अशक्तपणा जाणवत नाही. कडधान्यांप्रमाणेच जवस ही वजन घटवण्यासाठी अतिशय उपयुक्त आहेत. यामध्येही फायबरचे प्रमाण खूप जास्त आहे. तसेच जवसामध्ये ओमेगा ३ फॅटी ॲसिड्सही आहेत. आजवर केल्या गेलेल्या अनेक शास्त्रीय अभ्यासांमध्ये हे निदान केले गेले आहे की ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स वजन घटवण्यास सहाय्यक असून हृदयाच्या आरोग्याकरिताही अतिशय गुणकारी आहेत. जवस भाजून त्याची पूड करून घेऊन ही पूड आपले ज्यूस, स्मूदी, दही व ताकामध्ये मिसळून सेवन करावी.

# डोके दुखतेय? हे करून पहा

आपल्या शरीराचा महत्त्वाचा भाग म्हणजे डोके. डोक्याच्या कवटीत आपला मेंदू असतो व हा मेंदूच साऱ्या शरीराचे नियंत्रण करत असतो. डोकेदुखीचा त्रास झाला नाही असा माणूस शोधूनही सापडणे अवघड. डोके दुखायला लागले की काही सुचेनासे होते. अशा वेळी चटकन एखादी वेदनाशामक गोळी घेण्याकडे आपला सहजच कल असतो. पण डोके नक्की कोणत्या कारणाने दुखते हे कळले तर त्यावर अगदी सहज सोपे उपाय करूनही ही डोकेदुखी थांबवता येते. त्यासाठी ही माहिती जरूर वाचा.

■ डोके दुखत असेल तर अमसुले पाण्यात भिजत घालून, कुस्करून साखर मीठ घातलेले सरबत अथवा कोकम सरबत घ्यावे.

■ बरेच वेळा रात्री काही कारणाने झोपायला उशीर होतो व जागरण होते. जागरणाने डोके दुखत असेल तर १५ मिनिटे झोप अथवा विश्रांती हा चांगला उपाय आहे. डोक्यातील कलकलही या विश्रांतीमुळे कमी होते.

■ वेळी-अवेळी खाणे. सततचे उपवास अथवा बराच काळ उपाशी राहणे याने पित्त वाढते व बरेच वेळा त्यामुळे डोकेदुखी होते. पित्ताने डोके दुखत असल्यास गार दूध प्यावे.

■ अर्धशिशीचा त्रास होत असेल तर - सुंठ अधिक जायफळ यांचा लेप भुवईच्या वर लावावा. शिंक काढण्याच्या कोणत्याही उपायाने शिंक काढल्यासही अर्धशिशी कमी होते अथवा सकाळी उठल्याबरोबर पेढा खाल्ल्याने ती कमी होते. अर्धशिशी पित्त व सर्दीमुळे होते. पेढ्याने पित्त कमी होते व शिंक काढण्याने सर्दी मोकळी होते. अर्धशिशी म्हणजे डोक्याचा अर्धा भाग दुखणे. हे दुखणे त्रासदायक असते व सूर्योदयापासून ते सुरू होते ते सूर्यास्तानंतर कमी होते.

■ सर्दी अथवा बारीक ताप किंवा अंग मोडून येणे यासारख्या आजारातही डोके दुखते. गरम पाण्याच्या पिशवीने डोके शेकून काढल्यास ही डोकेदुखी थांबते. अथवा अमृतांजन किंवा तत्सम बाम डोक्यास चोळल्यासही आराम पडतो.



■ बरेच वेळा जादा वाचन, टीव्ही पाहणे अथवा डोळ्यावर ताण आणणारी कामे झाल्यासही डोके दुखते. अशा वेळी डोळ्यांना चष्मा आला नाही ना, याची खात्री करून घ्यावी. डोळ्याला नंबर आल्यानेही डोकेदुखी होते व योग्य नंबरचा चष्मा वापरायला सुरुवात केली की ती बंद होते.

# चेहऱ्यावरील केस हटवण्याकरिता अवलंबा हे उपाय

चेहऱ्यावरील नकोसे असणारे केस कसे हटवावे हा तरुण मुली किंवा महिलांच्या समोरील मोठा प्रश्नच असतो. हे केस हटवण्याकरिता अनेक उपाय उपलब्ध आहेत. त्यापैकी वॅक्सिंग, थ्रेडिंग, लेसरद्वारे केस काढून टाकणे असे अनेक उपाय साधारणपणे अवलंबले जातात. पण या उपायांच्या व्यतिरिक्त घरच्या घरी काही उपाय करून चेहऱ्यावरील केस हटवता येऊ शकतात. या उपायांच्या अवलंबाने चेहऱ्यावरील केसांची वाढ हलकी होऊन कालांतराने संपूर्णपणे बंद होते.



चेहऱ्यावरील केस काढून टाकण्याकरिता एक उत्तम फेस पॅक घरच्या घरी तयार करता येतो. एका भांड्यामध्ये अर्धा कप बेसन, एक लहान चमचा हळद, एक लहान चमचा दुधावरची साय आणि अर्धा कप दूध हे सर्व एकत्र करून त्याची दाट पेस्ट बनवावी. ही पेस्ट चेहऱ्यावर व्यवस्थित लावून घ्यावी. सुमारे अर्धा तास ही पेस्ट चेहऱ्यावर तशीच राहू द्यावी. त्यानंतर ज्या दिशेने केसांची वाढ असेल, त्याच्या विरुद्ध दिशेने चेहरा हळुवार गोलाकार चोळण्यास सुरुवात करावी. हा फेस पॅक चेहऱ्यावरून पूर्णपणे काढून टाकल्यानंतर कोमट पाण्याने चेहरा स्वच्छ धुवून टाकावा. आठवड्यातून दोन वेळेला या फेस पॅकचा वापर करावा. एका बाऊलमध्ये एक मोठा चमचा पपईचा गर, अर्धा लहान चमचा हळद आणि चार मोठे चमचे ॲलो व्हेरा जेल वापरून पेस्ट तयार करावी. आपल्या चेहऱ्यावर नकोशा केसांची वाढ जिथे आहे, त्या भागावर ही पेस्ट लावून, सुमारे वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर केसांच्या वाढीच्या विरुद्ध दिशेने चोळत पेस्ट चेहऱ्यावरून उतरवून टाकावी व नंतर कोमट पाण्याने चेहरा धुवून टाकावा. एका मोठ्या लिंबाच्या रसामध्ये एक मोठा चमचा मध मिसळावा. हे मिश्रण वीस ते पंचवीस मिनिटे चेहऱ्याला लावून ठेवावे. या फेस मास्कमुळे चेहऱ्यावरील केसांची वाढ हलकी होत जाते आणि कालांतराने संपूर्णपणे थांबून जाते.



## साध्या पद्धतीने चेहरा स्वच्छ ठेवण्याच्या काही टिप्स

**घरच्या घरी सहज साध्या पद्धतीने चेहरा स्वच्छ ठेवण्याच्या काही टिप्स आहेत, त्यामुळे दिवसाच्या थकव्यानंतर त्वचेला स्वच्छ करणे तसेच पुनरुज्जीवित करणे आवश्यक असते. त्यासाठी घरच्या घरी सहज साध्या पद्धतीने चेहरा स्वच्छ ठेवण्याच्या काही टिप्स**

ही काळजी घ्या आणि सतेज कांती मिळवा

■ चेहरा धुण्यासाठी तुमच्या त्वचेनुसार योग्य ते फेस वॉश अथवा क्लिंजिंग वापरा.

■ चेहऱ्यावरील छिद्र बुजवण्यासाठी क्लिंजिंग मिल्कच्या सहाय्याने चेहरा साफ करा.

■ चेहऱ्याच्या त्वचेला सोसवेल इतकी गरम वाफ घ्या.

■ चेहरा थंड करण्यासाठी बर्फाने मसाज करा.

■ त्यानंतर फेस स्क्रबरने ८-१० मिनिटे चेहरा साफ करा.

■ चेहरा सुकल्यानंतर चेहऱ्याला मध लावा जेणेकरून त्वचा उजळ होण्यास मदत होईल

■ चेहरा स्वच्छ धुवून आवडीनुसार फेस पॅक लावा.

■ हळूहळू चेहरा सुकू द्या.



# कापूर : छोट्या-मोठ्या आजारात प्रभावी औषध

**कापूर** हा विशिष्ट झाडांपासून बनवला जाणारा सुगंधी पदार्थ घरात, मंदिरात पूजा करताना आवर्जून वापरला जातो. देवाची कापूर आरती करण्याची प्रथा भारतात सर्वत्र आहे. हा कापूर आयुर्वेदात एक घरगुती औषधी म्हणून महत्त्वाचा मानला गेला असून त्याचे अनेक उपयोग आहेत. इतकेच नव्हे तर त्वचा, केस, स्नायू यांचे अनेक विकार त्याने दूर करता येतात. कापूर आणि त्याचे तेल यांचा वापर अनेक औषधे बनवताना केला जातो. त्यापासून अनेक मलमे बनवली जातात. पोटदुखी असेल तर एक ग्लास पाण्यात १ चमचा ओवा घालून ते पाणी उकळवून अर्धे झाले की त्यात थोडा कापूर घालून प्यायल्याने दुखण्याला उतार पडतो. सांधेदुखीत कापूर तेलाचे मालिश केल्यास बरे वाटते. तसेच खाज, इन्फेक्शन यावर खोबरेल तेलात कापूर घालून चोळण्याने आराम पडतो. भाजले असेल तर त्या ठिकाणी कापूर तेल लावल्यास जळजळ थांबते आणि संसर्ग होत नाही. इतकेच नव्हे तर घरात कापूर जाळला तरी घरातील जंतू नष्ट होतात. तोंडावर मुरमे, पुटकुळ्या येत असतील तर खोबरेल तेल आणि कापूर यांचे मिश्रण त्वचेवर चोळल्यास डाग राहत नाहीत. कोमट पाण्यात कापूर आणि थोडे मीठ घालून पाय बुडवून बसले तर टाचेच्या भेगा कमी होतात. ओलिव्ह तेलात कापूर घालून त्याने डोक्याला मसाज केल्यास स्ट्रेस, डोकेदुखी थांबते. दातदुखी असेल तर कापूर पावडर दातात धरली तर दात दुखायचा थांबतो. सर्दी खोकला झाल्यास खोबरेल तेल आणि कापूर यांचे मिश्रण छाती, डोक्यावर चोळावे. आराम पडतो. जुलाब होत असतील तर ओवा, कापूर आणि पेपरमिंट समप्रमाणात घेऊन काचेच्या बरणीत उन्हात ठेवावे. ६-८ तासांनंतर मिश्रणाचे ४-५ थेंब टाकून सरबत घ्यावे. रात्री झोपण्यापूर्वी कच्चे दुध आणि कापूर पावडर कापसाने चेहऱ्यावर लावावी आणि १५ मिनिटाने धुवावे. त्वचा चमकदार आणि हेल्दी होते. कापले किंवा कोणत्याची कारणाने जखम झाली तर कापूरमिश्रित पाणी लावावे. तोंड आल्यास शुद्ध तुपात कापूर घालून सेवन केल्यास उतार पडतो. पर्यटन अथवा ट्रेकिंगसाठी अधिक उंचीच्या ठिकाणी गेल्यास अनेकदा श्वास घ्यायला त्रास होतो, चक्कर येते अशावेळी कापूर नुसता हुंगला तरी आराम पडतो.



# किती लोकांनी पाहिलं तुमचं इंस्टाग्राम प्रोफाइल? असं करा चेक

**तुमचं इंस्टाग्राम प्रोफाइल किती लोकांनी पाहिलं हे जाणून घेण्याचे काही मार्ग आहेत. त्यांची माहिती आपण आज घेणार आहोत. तसेच अनावश्यक लोकांपासून दूर राहण्याचा उपाय देखील सांगणार आहोत.**

सध्या इंस्टाग्राम हे सर्वाधिक वापरलं जाणारं सोशल मीडिया ॲप बनलं आहे. बऱ्याचदा लोक लाइक्स आणि फॉलोवर्स मिळवण्यासाठी फोटो आणि व्हिडीओ शेअर करतात. परंतु काही वेळा लोक आपल्या प्रोफाइलवर हवे तेव्हा येतात आणि फॉलो न करता जातात. तुम्हाला जर अशा लोकांना रंगेहात पकडायचं असेल तर तुम्ही काही ट्रिक्स वापरू शकता. चला जाणून घेऊया कशाप्रकारे तुम्ही तुमच्या इंस्टाग्राम प्रोफाइलवर पाळत ठेवणाऱ्या युजर्सना शोधू शकता.



**इंस्टाग्राम प्रोफाइल कोणी पाहिलं हे कसं बघायचं**

वर सांगितल्याप्रमाणे अनेक मार्गानी इंस्टग्राम प्रोफाइल कोणी पाहिलं हे बघता येतं. लक्षात असू द्या हे मार्ग पूर्ण माहिती देत नाहीत. ह्यात स्टोरी व्युज, हायलाइट व्युज आणि थर्ड पार्टी ॲप्सचा समावेश आहे.

**इंस्टाग्राम स्टोरी कोणी पहिली हे कसं बघायचं**

■ स्टोरी पोस्ट केल्यावर तुमच्या प्रोफाइल आयकॉनवर होम किंवा प्रोफाइल टॅबमधून टॅप करा.

■ प्रोफाइल पिक्चरवर टॅप करून स्टोरीज ओपन करा.

■ त्यानंतर स्वाइप अप करून कोणी स्टोरीज पाहिल्या हे चेक करा.

**नोट:** स्टोरी अपलोड केल्यावर २४तासांमधील व्युज इथे दिसतील.

**असं पाहा इंस्टाग्राम स्टोरीज हायलाइट्स कोणी पहिल्या**

■ खालच्या बाजूला उजवीकडे असलेल्या प्रोफाइल आयकॉनवर टॅप करा.

■ प्रोफाइल सेक्शनमध्ये स्टोरीज हायलाइट्सवर टॅप करा.

■ कोणत्याही हायलाइटमधील स्टोरी ओपन करा.

■ त्यानंतर स्टोरी हायलाइट स्वाइप अप करा.

■ तुम्हाला तुमच्या स्टोरीज आणि हायलाइट कोणी पहिल्या ते दिसेल.

**नोट :** इथे फक्त ४८ तासांचे व्युज दिसतात.

**प्रोफाइल व्युज बघण्यासाठी बिजनेस प्रोफाइलचा वापर**

इंस्टाग्राम बिजनेस प्रोफाइल युजर्सना इंटरॅक्शन आणि रिचची माहिती देतं. त्यामुळे युजर्सना त्यांच्या प्रोफाइलला भेट देणाऱ्यांची संख्या कळते. तसेच त्यांच्या फोटोवरील व्युज आणि रिचची डेमोग्राफिक माहिती मिळते. इंस्टाग्रामवरील बिजिनेस प्रोफाइल व्हिजिटर्सवर लक्ष ठेवण्यासाठी चांगलं माध्यम आहे. लक्षात असू द्या बिजिनेस प्रोफाइल इनसाइट्सच्या मदतीनं तुम्ही फक्त व्हिजिटर्सची संख्या जाणू शकता, नावे नाही.

**इंस्टाग्रामवर बिजिनेस प्रोफाइल कसं बनवायचं**

- उजवीकडे खालच्या बाजूल असलेल्या तुमच्या प्रोफाइल आयकॉनवर टॅप करा.
- वरच्या बाजूला उजव्या कोपऱ्यात असलेल्या मेन्यू आयकॉनवर टॅप करून सेटिंग आणि प्रायव्हसी मेनूमध्ये जा.
- खाली स्क्रोल करा आणि "Account Type and Tools" वर क्लिक करा.
- अकाऊंट टाइप आणि टूल मध्ये 'Switch to Professional Account' वर क्लिक करा.
- कंटिन्यूवर टॅप करून प्रोसेस पूर्ण करा.
- बिजनेस प्रोफाइलचे इनसाइट्स कसे बघायचे
- बिजिनेस अकाऊंट म्हणून व्हेरिफिकेशन केल्यावर
- तुमच्या प्रोफाइलवर जा
- बायोच्या खाली असलेल्या इनसाइट्स ऑप्शनवर टॅप करा.

**अनोळखी लोकांना इंस्टाग्राम प्रोफाइलपासून कसं दूर ठेवायचं?**

अनोळखी लोकांना आपल्या प्रोफाइलपासून दूर ठेवणं सोपं आहे. तुम्ही तुमचं अकाऊंट प्रायव्हेट करू शकता. अकाऊंट प्रायव्हेट केल्यावर तुम्ही तुम्हाला कोण फॉलो करू शकतं आणि कोण प्रोफाइल पाहू शकतं हे ठरवू शकता.

**इंस्टाग्राम अकाऊन्ट प्रायव्हेट करण्याची पद्धत**

■ तुमच्या प्रोफाइलमध्ये जा ■ सेटिंग्स मेनूवर टॅप करा ■ खाली स्क्रोल करून अकाऊंट प्रायव्हसीवर टॅप करा ■ प्रायव्हेट अकाऊंटसमोरील टॉगल ऑन करा.

तुमचं अकाऊंट प्रायव्हेट केल्यावर तुम्ही तुम्हाला कोण फॉलो करणार हे ठरवू शकता. तसेच ह्याच स्टेप्स फॉलो करून तुम्ही अकाऊंट पुन्हा पब्लिक करू शकता.

# राज्यभरातील अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय... २०११ पर्यंतच्या अतिक्रमणांना फायदा

■ **बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हा वगळता राज्यात सन २०११ पर्यंत झालेली तसेच सध्या केवळ निवासासाठी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. महसूल विभागाने बुधवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे. त्यानुसार ५०० चौरस फुटांपर्यंतचे निवासी अतिक्रमण पूर्णपणे विनामूल्य नियमित करण्यात येणार आहे. तर उर्वरित क्षेत्रासाठी प्रचलित बाजारमूल्याच्या केवळ दहा टक्के रक्कम कब्जेहक्काची रक्कम म्हणून आकारली जाईल.

मात्र नदीपात्र, नाले, गायरान, सार्वजनिक रस्ते, वने, स्मशानभूमी, खेळण्याचे मैदान किंवा शाळा अथवा रुग्णालयासाठी आरक्षित असलेल्या जमिनींवरील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत नियमित केली जाणार नाहीत. अशा बाधित कुटुंबांना 'पंतप्रधान आवास योजने'तून पयार्यी घरे उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्याचवेळी भारताचा नागरिक नसलेल्या कोणत्याही व्यक्तीचे अतिक्रमण नियमित होणार नाही याची दक्षता अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने घ्यायची आहे. असे अतिक्रमण आढळल्यास पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

'सर्वांसाठी घरे' हे धोरण आणि



'विकसित महाराष्ट्र २०४७' चे उद्दिष्ट गाठण्यासाठी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. यामुळे वेगवेगळ्या शासन मान्यतेची गरज पडणार नाही. या समित्याच निर्णय घेतील. जिल्हास्तरावर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १७ सदस्यांची समिती असून, विधानसभा क्षेत्रनिहाय आमदारांच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापण्यात येणार आहेत.

अतिक्रमण नियमित करण्यासाठीची पात्रता, अटी आणि शर्ती, जागेची मयार्दा तसेच शुल्क आकारणी, अंलबजावणीची कार्यपद्धती, अजार्सांठीची मुदत, पडताळणी, अंमलबजावणी यंत्रणा अशी सर्व यंत्रणा सज्ज करण्यात येणार आहे.

**प्रमुख वैशिष्ट्ये आणि अटी**

- जमीन पती -पत्नी यांच्या संयुक्त नावाने 'भोगवटादार वर्ग-२' म्हणून दिली जाईल
- ग्रामीण तसेच शहरी भागात जास्तीत जास्त १५०० चौ. फुटापर्यंतचे क्षेत्र नियमित
- जास्त असलेले अतिक्रमण पाडण्यात येईल.
- घराचा काही भाग व्यवसायासाठी वापरत असल्यास, बाजारमूल्याच्या २५% रक्कम
- जमिनीच्या नोंदणीसाठी १००० चौ. फुटापर्यंत १००० रुपये शुल्क
- १ जानेवारी २०११ पूर्वीच्या वास्तव्यासाठी मतदार यादी, वीज बिल, मालमत्ता पावती ग्राह्य
- गेल्या १ वर्षातील रहिवासाचा पुरावा बंधनकारक

> "राज्यातील एकही गरजू कुटुंब निवाऱ्याविना राहू नये ही सरकारची भूमिका असल्याने १ जानेवारी २०११ पर्यंतची अतिक्रमणे नियमानुकूल करून आम्ही गरिबांना दिलासा दिला आहे. यामुळे लाखो कुटुंबांच्या आयुष्यात स्थिरता येईल. दर तीन महिन्याने या संदभार्तील आढावा घेतला जाईल."
> -चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री

# उच्च न्यायालयाचा बेस्ट प्रशासनाला दणका

## कर्मचाऱ्याच्या वारसाला मदतीपासून वंचित ठेवणे अमानवीय

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

कर्तव्य बजावताना कोरोनाची लक्षणे असूनही केवळ 'आरटीपीसीआर' चाचणी झाली नाही, या तांत्रिक कारणास्तव बेस्ट कर्मचाऱ्याचा कोरोनाने मृत्यू झाल्याचे नाकारणे, तसेच कर्मचाऱ्याच्या वारसाला मदतीपासून वंचित ठेवणे अमानवीय आहे, असे ताशेरे ओढत उच्च न्यायालयाने बेस्ट प्रशासनाला दणका दिला. बेस्ट प्रशासनाने कर्मचाऱ्याच्या वारसाला ५० लाख रुपयांची सानुग्रह मदत आणि अनुकंपा तत्त्वावर नोकरीही द्यावी, असे आदेश न्यायालयाने दिले.



**शक्यतांची प्रबळता लक्षात घ्या...**
याचिकेवर न्यायमूर्ती आर. आय. छागला आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने निर्णय दिला. अशा प्रकरणांमध्ये मृत्यूचे कारण सिद्ध करण्यासाठी 'शंकेपलीकडील पुरावा' न पाहता 'शक्यतांची प्रबळता' लक्षात घेतली पाहिजे, असे खंडपीठाने निर्णय देताना म्हटले.

नयन वसंत लाकेश्री हे बेस्ट प्रशासनामध्ये बस वाहक (कंडक्टर) म्हणून कार्यरत होते. ४ जून २०२० रोजी कर्तव्यावर असताना त्यांना कोरोनाची लक्षणे जाणवू लागली. त्यांना तातडीने सेव्हन हिल्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे ६ जून २०२० रोजी त्यांचा मृत्यू झाला. रुग्णालयाने मृत्यूचे संभाव्य कारण 'कोरोना संशयित' आणि 'हृदयविकाराचा झटका' असे नमूद केले होते. परंतु, त्यांची 'आरटीपीसीआर' चाचणी झाली नसल्याचे कारण पुढे करत बेस्ट प्रशासनाने त्यांचा मुलगा सुबोध लाकेश्रीला अनुकंपा तत्त्वावर नोकरीसाठीचा अर्ज फेटाळला होता. प्रशासनाच्या भूमिकेला सुबोधने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

# १४०० कुटुंबांवर बेघर होण्याची टांगती तलवार

■ **ठाणे। प्रतिनिधी,**



ठाणे महानगरपालिका प्रशासनाने सुमारे १४०० रहिवाशांना रेंटल हाऊसिंगमधील घरे रिकामी करण्याच्या नोटीस बजावल्याने मोठी खळबळ उडाली आहे. ऐन परीक्षांच्या काळात स्थलांतराचा आदेश मिळाल्याने रहिवासी हवालदिल झाले असून, "आता मुलांना घेऊन कुठे जायचे?" असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे. २०१३ पासून ठाणे महापालिकेने धोकादायक इमारतींतील नागरिक, झोपडपट्टीधारक तसेच रस्ते रुंदीकरण व नाल्यांलगत राहणाऱ्या कुटुंबांचे पुनर्वसन होईपर्यंत त्यांना एमएमआरडीएच्या रेंटल हाऊसिंग प्रकल्पांमध्ये तात्पुरती राहण्याची सोय उपलब्ध करून दिली होती. या योजनेंतर्गत हजारो कुटुंबांना सुरक्षित निवारा मिळाला होता. मात्र, गेल्या काही दिवसांपासून महापालिकेच्या स्थावर मालमत्ता विभागाकडून 'दोस्ती रेंटल'मधील रहिवाशांना घरे खाली करण्याच्या नोटीस देण्यात येत आहेत. या नोटिसांमध्ये अनेक वर्षांचे थकीत भाडे भरण्याचे निर्देश देण्यात आले असून, केवळ ११ महिन्यांसाठी तात्पुरता निवारा देण्यात आला होता, त्यामुळे आता घरे रिकामी करावीत, असे नमूद करण्यात आले आहे.

# 21 प्रवर्गातील दिव्यांगांना शासन योजनांचा लाभ

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 अंतर्गत निर्धारित करण्यात आलेल्या सर्व 21 प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना राज्य शासन तसेच तत्सम यंत्रणांच्या विविध योजना, सवलती, लाभ, अनुदान व इतर सुविधांसाठी पात्र ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय दिव्यांग व्यक्तींच्या सर्वसमावेशक सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असून, राज्यातील अधिकाधिक दिव्यांग नागरिकांना शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यास मोठी चालना मिळणार आहे, अशी माहिती दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिली.

सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, या निर्णयामुळे यापूर्वी 1995 च्या अधिनियमानुसार केवळ 7 प्रवर्गापुरते मर्यादित असलेले लाभ आता विस्तारून सर्व 21 प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींना उपलब्ध होणार आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2026 लागू झाल्यानंतरही काही शासकीय कार्यालयांमध्ये जुन्या निकषांनुसारच लाभ दिला जात असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे नव्याने समाविष्ट प्रवर्गातील दिव्यांगांना योजनांचा



लाभ मिळण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर शासनाने स्पष्ट, एकसंघ व सर्वसमावेशक धोरण निश्चित करत हा निर्णय घेतला आहे.

या निर्णयानुसार अस्थिव्यंग, कुष्ठरोगमुक्त, मेंदूचा पक्षाघात, शारीरिक वाढ खुंटणे, स्नायूंची विकृती, आम्ल हल्ला पिडीत, पुर्णतः अंधत्व, अंशतः अंध, कर्णबधिरता, वाचा/भाषा दोष, बौद्धिक अक्षम, विशिष्ट अध्ययन अक्षम, स्वमग्नता, मानसिक आजार, मल्टिपल स्क्लेरोसिस, पार्किन्सन, हिमोफिलिया, थॅलेसेमिया, सिकल सेल, मज्जासंस्थेचे तीव्र आजार आणि बहुविकलांग अशा सर्व 21 प्रवर्गांचा समावेश करण्यात आला आहे.

हा लाभ घेण्यासाठी संबंधित व्यक्तीकडे किमान 40 टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असल्याचे सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेले वैध वैश्विक दिव्यांग ओळखपत्र असणे आवश्यक आहे. तसेच कायमस्वरूपी दिव्यांगत्व प्रमाणपत्रधारकांनाच योजनांचा लाभ मिळणार असून, तात्पुरत्या प्रमाणपत्रधारकांना लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

या निर्णयामुळे दिव्यांग व्यक्तींना गृहनिर्माण योजना, विविध शिष्यवृत्ती योजना, दिव्यांग विवाह योजना, गुणवत्ता पुरस्कार, प्रशिक्षित दिव्यांग व्यक्तीना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य, दिव्यांग व्यक्तींना साधने व उपकरणांसाठी आर्थिक सहाय्य, राज्य पुरस्कार योजना, बीज भांडवल योजना तसेच इतर विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणार आहे. हा निर्णय सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे व अनुदानित संस्थांना लागू राहणार असून संबंधित विभागांनी आवश्यकतेनुसार नवीन योजना आखून स्वतंत्र शासन निर्णय जारी करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

हा निर्णय दिव्यांग व्यक्तींच्या सर्वसमावेशक विकासासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. याबाबतचा शासन निर्णय दिव्यांग सक्षमीकरण विभागाने निर्गमित केला असून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# पुण्यात पोलीस भरती चाचणीत २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू... खाकी वर्दीचं स्वप्न अधुरंच

■ **पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यात सध्या सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान धावण्याची मैदानी चाचणी देत असताना एका २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. पुरुषोत्तम बारकुल (रा. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा) असे या दुर्दैवी तरुणाचे नाव असून ही घटना शनिवारी सकाळी शिवाजीनगर पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर घडली.

पुणे शहर पोलीस दल आणि कारागृह विभागातील रिक्त पदांसाठी गेल्या महिन्याभरापासून भरती प्रक्रिया राबवली जात आहे. शनिवारी सकाळी साडेनऊ ते दहाच्या सुमारास पुरुषोत्तम बारकुल हा १६०० मीटर धावण्याच्या चाचणीसाठी मैदानात उतरला होता. पोलीस भरतीमधील ही चाचणी अत्यंत कठीण मानली जाते. पुरुषोत्तमने मैदानाच्या दोन फेऱ्या यशस्वीरीत्या पूर्ण केल्या



होत्या, मात्र तिसऱ्या फेरीदरम्यान त्याला अचानक भोवळ आली. काही प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, तो चौथ्या फेरीच्या तयारीत असताना त्याला प्रचंड दम लागला आणि छातीत कळ आल्याने तो धावतानाच मैदानावर कोसळला.

मैदानावर हा प्रकार घडताच तेथे असलेल्या पोलीस उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि वैद्यकीय पथकाने तातडीने पुरुषोत्तमच्या दिशेने धाव घेतली. वैद्यकीय पथकाने त्याची प्राथमिक तपासणी केली असता त्याचे हृदयाचे ठोके अत्यंत मंद झाल्याचे निदर्शनास आले. त्याला तातडीने रुग्णवाहिकेने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासणी अंती त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले.

प्राथमिक अंदाजानुसार, धावताना हृदयविकाराचा झटका आल्याने पुरुषोत्तमचा मृत्यू झाला असावा, असे सांगण्यात येत आहे.

# कराडजवळील शहापूर येथे बिबट्याचा हल्ला... युवक गंभीर जखमी, परिसरात भीतीचे वातावरण



■ **कराड। प्रतिनिधी,**

कराडपासून सुमारे १० किमी अंतरावरील शहापूर (ता. कराड) येथील रिसवड रस्त्यालगत असलेल्या पन्नाशी नावाच्या शेतशिवारात शनिवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास बिबट्याने एका युवकावर हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात निखिल मारुती वांगडे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर कराड येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निखिल वांगडे हे शेतात पिकांना पाणी देण्यासाठी गेले असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यात त्यांच्या हातांवर, चेहऱ्यावर आणि मानेवर जखमा झाल्या. मात्र त्यांनी धैयार्ने हातातील खोऱ्याने प्रतिकार करत आरडाओरडा केल्याने पुढील अनर्थ टळला.

स्थानिकांच्या माहितीनुसार, शहापूर, वडोली निळेश्वर, शिरवडे आणि रिसवड परिसरात मागील महिनाभरापासून एका मादी बिबट्या आणि तिच्या दोन बछड्यांचा वावर वाढला आहे. काही दिवसांपूर्वी रिसवड येथे बिबट्याने शेळ्यांवर हल्ला करून त्यांना ठार केल्याची घटना घडली होती. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# दुबईतील बुर्ज खलिफा येथील फ्लॅट्ससह ईडीकडून 1700 कोटींची मालमत्ता जप्त

## मुंबईतही 2 एफआयआर दाखल



■ **मुंबई। प्रतिनिधी,**

महादेव ऑनलाइन सट्टेबाजी ॲप प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई करत सुमारे 1700 कोटी रुपयांच्या 20 स्थावर मालमत्ता तात्पुरत्या स्वरूपात जप्त केल्या आहेत. तपास यंत्रणेने बुधवारी माहिती दिली की, जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांपैकी 18 मालमत्ता संयुक्त अरब अमिराती (यूएई) मधील दुबई येथे आहेत, तर दोन मालमत्ता देशाची राजधानी नवी दिल्लीत आहेत.

दुबईमध्ये जप्त केलेल्या मालमत्तांमध्ये जगातील सर्वात उंच इमारत असलेल्या बुर्ज खलिफामधील अनेक आलिशान फ्लॅट्स, दुबई हिल्स इस्टेटमधील लक्झरी व्हिला आणि बिझनेस बे कमर्शियल डिस्ट्रिक्टमधील हाय-एंड फ्लॅट्सचा समावेश आहे. याशिवाय, एसएलएस हॉटेल ॲंड रेसिडेन्सेससारख्या नामवंत टॉवर्समधील मालमत्ताही अटॅच करण्यात आल्या आहेत.


ईडीच्या तपासानुसार, या सर्व मालमत्ता महादेव सट्टेबाजी ॲपचा मुख्य प्रवर्तक सौरभ चंद्राकर याच्याशी संबंधित व्यक्ती आणि संस्थांच्या नावावर होत्या. तपासात असे स्पष्ट झाले आहे की, या मालमत्ता खरेदी करण्यासाठी वापरलेला पैसा अवैध सट्टेबाजीतून मिळालेल्या कमाईचा म्हणजेच 'प्रोसीड्स ऑफ क्राईम'चा भाग होता. छत्तीसगडचा रहिवासी असलेला सौरभ चंद्राकर आणि त्याचा सहकारी रवि उप्पल यांनी हे संपूर्ण जाळे फ्रँचायझी मॉडेल म्हणून उभे केले होते. या अवैध व्यवसायातील नफ्याचा सुमारे 70 ते 75 टक्के हिस्सा प्रवर्तकांकडे जात असे, तर उर्वरित हिस्सा पॅनेल ऑपरेटरमध्ये विभागला जात असे.

या हाय-प्रोफाइल प्रकरणाचे धागेदोरे जसजसे समोर येत आहेत, तसतसे यामध्ये छत्तीसगडमधील अनेक वरिष्ठ राजकारणी आणि नोकरशहांची नावेही समोर आली आहेत. ईडीने आतापर्यंत देशभरात 175 हून अधिक ठिकाणांवर छापेमारी केली असून याप्रकरणी 13 जणांना अटक करण्यात आली आहे. रायपूरच्या विशेष न्यायालयात दाखल केलेल्या पाच आरोपपत्रांमध्ये एकूण 74 जणांना आरोपी करण्यात आले आहे.

भारत सरकार आता मुख्य आरोपींच्या प्रत्यार्पणासाठी प्रयत्न करत आहे, कारण सौरभ चंद्राकरचे शेवटचे लोकेशन यूएईमध्ये आढळले होते, तर रवि उप्पल आखाती देशातून वानुआतुला पळून गेल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मुंबईतही या प्रकरणाशी संबंधित दोन स्वतंत्र एफआयआर दाखल असल्याने तपासाची व्याप्ती अधिकच वाढली आहे.

# ठाण्यात कोट्यवधींचे एमडी ड्रग्ज जप्त

## तिघांना अटक, कुठून आले ड्रग्ज?




■ **ठाणे। प्रतिनिधी,**

नौपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत चरईमध्ये पोलिसांनी २ किलो ६२ ग्रॅम ड्रग्ज जप्त करून एकूण तिघांना अटक केली आहे. या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गिरीष पाटील यांना खबऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ कर्णवर पाटील, उपनिरीक्षक दीपक डुम्मलवाड यांच्या पथकाने २३ मार्च गरोजी संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी चरईतील एमटीएनएल कार्यालयासमोर सोहेल दिलीप खान (२६, कोपरी) आणि रोहित विलास सीतापुरे (२१, गायकवाड पाडा नं.२, उल्हानगर) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून एकूण २ किलो ६२ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त केले. सोहेल खानकडून १ किलो ५६ ग्रॅम आणि रोहितकडून १ किलो ६ ग्रॅम एमडी पावडर जप्त करण्यात आली.

या ड्रग्जचे धागेदोरे राजेश हडावले (२३, कोपरी) याच्यापर्यंत पोहोचल्याने पोलिसांनी त्यालाही अटक केली आहे. त्यांनी हे ड्रग्ज कुठून आणले आणि कुणाला देणार होते, याची माहिती पोलीस घेत आहेत. न्यायालयाने तिन्ही आरोपींची २८ मार्चपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे. पोलिसांनी ही कामगिरी उपायुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव, सहा.पोलीस आयुक्त रविंद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे, सहा.पोलीस निरीक्षक निलेश मोरे, सोमनाथ कर्णवर पाटील, उपनिरीक्षक दीपक डुम्मलवाड, राजेंद्र निकम, मोहन परब, हवालदार अमोल पवार, हुसेन तडवी, अजय सपकाळ, अमित सपकाळ, अभिजीत मोरे, गिरीष पाटील, आबाजी चव्हाण, अनुप राक्षे, शिल्पा कसबे, कोमल लादे यांनी कामगिरी बजावली.


**परिपत्रक – ४**
**(नियम ८ पहा)**
**मराठी एकीकरण बातमी पत्र (जि. ठाणे) या वृत्तपत्राचा मालक आणि इतर तपशील खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| १) प्रकाशनाचे स्थळ | : | सदनिका क्र. १०३, कुणाल कुटीर, बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मंदीराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०१ १०५ , महाराष्ट्र. |
| २) प्रकाशनाचा कालावधी | : | दैनिक |
| ३) मुद्रकाचे नाव | : | सोमाणी प्रिंटींग प्रेस (हंसाबेन मेहता) |
| नागरिकत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गाला नं. ४, एन.के.इंडस्ट्रियल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रियल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व), मुंबई ४०० ०६३, महाराष्ट्र. |
| ४) प्रकाशकाचे नाव | : | श्री. दिपक मोरेश्वर नाईक |
| नागरिकत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गुरुप्रसाद बंगला,रो हाऊस नं. ३, जुना गोल्डन नेस्ट फेज ३, क्वीन मेरी शाळेजवळ, मिरा भाईंदर रोड, मिरारोड (पुर्व), जि. ठाणे ४०११०७, महाराष्ट्र. |
| ५) संपादकाचे नाव | : | श्री. दिपक मोरेश्वर नाईक |
| नागरिकत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गुरुप्रसाद बंगला,रो हाऊस नं. ३, जुना गोल्डन नेस्ट फेज ३, क्वीन मेरी शाळेजवळ, मिरा भाईंदर रोड, मिरारोड (पुर्व), जि. ठाणे ४०११०७, महाराष्ट्र. |
| ६) मालकाचे नाव | : | श्री. दिपक मोरेश्वर नाईक |
| नागरिकत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गुरुप्रसाद बंगला,रो हाऊस नं. ३, जुना गोल्डन नेस्ट फेज ३, क्वीन मेरी शाळेजवळ, मिरा भाईंदर रोड, मिरारोड (पुर्व), जि. ठाणे ४०११०७, महाराष्ट्र. M. 9594418181 Email ID : marathiekikaran2021@gmail.com |

मी श्री. दिपक मोरेश्वर नाईक असे घोषीत करतो की वर नमुद केलेली संपुर्ण माहिती पुर्णपणे सत्य आहे.

तारीख : ३०.०३.२०२६

सही /-
श्री. दिपक मोरेश्वर नाईक



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com